दैनिक

# महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक ९० वा शनिवार दि.०७ सप्टेंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## ७८५ ग्रामपंचायतींना 'बाप्पा' पावला



लातूर : प्रतिनिधी–लातूर जिल्हयात श्री गणेशाच्या आगमनाची जोरदार तयारी सुरू असतानाच लातूर जिल्हयातील ७८५ ग्रामपंचायतींना २०२४–२५ च्या आराखडया नुसार २८ कोटी ४ लाख ५२ हजार रूपयांचा बंधितचा पहिला हप्ता दि. ६ सप्टेंबर रोजी लातूर जिल्हा परिषदेकडे आला आहे. त्यामुळे जिल्हयातील ७८५ ग्रामपंचायतींना गणपती बप्पा पावला असून या निधीतून ग्रामपंचायतींच्या विकास कामांना गती येणार आहे.

लातूर जिल्हयातील ७८५ ग्रामपंचायतींनी २०२४–२५ च्या खर्चाचे आराखडे तयार केले आहेत. या आराखडयांना मंजूरीही जिल्हा परिषदेच्याकडून मिळालेली आहे. या आराखडयानुसार ग्रामपंचातींना शासनाकडून येणारा निधी, अनुदान हे खर्च करणे बंधनकारक आहे. १५ व्या केंद्रीय वित्त आयोगातंर्गत ग्रामीण स्थानीक स्वराज्य संस्थांना २०२४–२५ या आर्थिक वर्षाच्या आराखडयानुसार लातूर जिल्हयातील ७८५ ग्रामपंचायतीसाठी २८ कोटी ४ लाख ५२ हजार रूपयांचा बंधित निधीचा पहिला हप्ता लातूर जिल्हा परिषदेच्याकडे प्राप्त झाला आहे.

२०२४–२५ या आर्थिक वर्षात १५ व्या केंद्रीय वित्त आयोगातंर्गत वितरीत निधीतून ग्रामपंचायत विकास आराखडयानुसार कामे व उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करावी लागणार आहे.

१५ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या २०२४–२५ या आर्थिक वर्षाच्या निधीतून ग्रामपंचायतींना विकास आराखडयानुसार गावातील जलजिवन मिशन मधून राहिलेली कामे, दुरूस्त्या, बरोबरच सांडपाणी, घनकचरा या स्वच्छतेच्या कामावर निधी खर्च करता येणार आहे. त्यामुळे गावातील स्वच्छता राखण्यास व पाणी पुरवठयांची कामे करण्यास या निधीचा हातभार लागणार आहे. १५ वा केंद्रिय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार पंचायत राज संस्थाच्या बळकटीकरणासाठी निधी जिल्हा परिषद स्तरावर आला असून तो ग्रामपंचायतींना लवकरच वर्ग होणार आहे.

## वसंतराव नाईक महाविद्यालय शिक्षक दिन साजर.



छ.संभाजीनगर(प्रतिनिधी)५सप्टेंबर२०२४ रोजी वसंतराव नाईक महाविद्यालयात शिक्षक दिन व डॉ . सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती साजरी करण्यात आली . कार्यक्रमाची सुरुवात डॉ . सर्वपल्ली राधाकृष्णन, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले , महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली .व्यासपीठावरील कार्यक्रमाचे सन्माननीय अध्यक्ष संस्थेचे सचिव श्री. नितीनजी राठोड , प्रमुख आतिथी डॉ. रमेशजी पांडव महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय शिंदे यांच्या स्वागतानंतर प्रा. प्रविण बोबडे यांनी गुरु वंदना व गीत सादर केले . प्रास्ताविकात डॉ. संजय शिंदे यांनी शिक्षकाची भूमिका स्पष्ट करतांना मोबाईल व तंत्रज्ञान शिक्षकाला पर्याय असू शकत नाही असे प्रतिपादन केले. आपल्या भाषणात श्री. रमेशजी पांडव यांनी डॉ . सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या शिक्षकी दृष्टीचे दाखले देत शिक्षणाचा वारसा पुढे चालू राहायला हवा असे प्रतिपादन केले. शिक्षकाने लळा लावल्यास उत्तम विद्यार्थी घडू शकतात. भारताचा वारसा विद्यार्थ्यांनीच जगभर पोहचवला आहे. आपल्याला जास्तीत जास्त भाषा अवगत व्हायला हव्यात; परंतु आपली भाषा कधीही विसरू नये .त्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये सभाधीटपणा यायला हवा. विद्यार्थ्यांनी बाबासाहेबांचे चिकित्सक विचार अंगीकारले पाहिजे,आपल्या सर्वांची संस्कृती एक आहे. आपली संस्कृतिक वीण आपण समजाऊन घेतली पाहिजे. महान नेत्यांनी ग्रंथाला गुरु मानले.विद्यार्थ्याला घडवण्याचे काम फक्त शिक्षकच करू शकतो म्हणून त्यांच्याशी जवळीक साधा असा मोलाचा सल्ला त्यांनी दिला. या प्रसंगी करण पोटावी,प्रणित वाकळे व वैभव सनांसे या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. आपल्या अध्यक्षीय समारोपात श्री. नितीनजी राठोड म्हणाले की, विद्यार्थ्यांनी दिशाहिन न होता विधायक कार्य केले पाहिजे .आपला बौद्धिक विकास करून घ्यावा,त्यांनी अभिव्यक्त व्हायला शिकले पाहिजे. शिक्षकांत संयम ,समजुतदारपणा , प्रेमळपणा असला पाहिजे तसेच कठोरपणाही असला पाहिजे त्यामुळे शिक्षण, जीवन सुसह्य करते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.साक्षी पाईकराव व कु. सोनाली कासलीवाल तर आभार कु. गीता जाधव हिने मानले.

## राजकीय नेतृत्व कणखर असेल तरच समाजाचा सर्वांगीण विकास -खा.डॉ.अजित गोपछडे

### वीरशैव लिंगायत सन्मान यात्रेचे लातुरात स्वागत





लातूर/प्रतिनिधी : राज्यात लिंगायत समाजाची लोकसंख्या मोठी आहे.व्यापार– उद्योगात समाज अग्रणी आहे.या समाजातील नेतृत्व आता पुढे आले पाहिजे.राजकीय नेतृत्व कणखर असले तरच सर्व समाजाचा सर्वांगीण विकास होऊ शकतो,असे प्रतिपादन खा.डॉ.अजित गोपछडे यांनी केले.

खा.डॉ.गोपछडे यांच्या नेतृत्वात सुरू असणारी वीरशैव लिंगायत सन्मान यात्रा शुक्रवारी (दि.६) लातूर शहरात दाखल झाली.शुक्रवारी सकाळी बसवेश्वर महाविद्यालयासमोरील महात्मा बसवेश्वरांच्या पुतळ्यास डॉ. गोपछडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.त्यानंतर बसवेश्वर महाविद्यालयात आयोजित संस्था विश्वस्त संवाद कार्यक्रमात डॉ. गोपछडे बोलत होते. व्यासपीठावर भाजपा नेत्या डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्यासह जंगम समाजाचे राष्ट्रीय अध्यक्ष श्रावण जंगम.संस्थाध्यक्ष आदिनाथ सांगवे,सचिव माधवराव पाटील टाकळीकर,यात्रा संयोजक नितीन शेटे,उद्योजक राजेश्वर बुके,प्राचार्य संजय गवई यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना खा.डॉ.गोपछडे म्हणाले की,लिंगायत समाज हा सर्वांना सोबत घेऊन पुढे जाणारा,देशावर प्रेम करणारा समाज आहे.हा समाज प्रामाणिकपणे व्यापार करतो.राज्यात समाजाची लोकसंख्या दीड कोटी आहे. तरीही राज्यातील ४८ लोकसभा मतदारसंघात एकही लिंगायत खासदार नाही. बोटावर मोजण्याएवढे आमदार आहेत.त्यामुळेच समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी कणखर नेतृत्व निर्माण होणे आता गरजेचे आहे.लातूर ही लिंगायतांची राजधानी आहे.येथे मोठे नेतृत्व उभे राहिलेले आहे. त्या नेतृत्वाच्या विचारांची परंपरा आपण जपली पाहिजे,असे त्यांनी सांगितले.

समाजातील युवक– युवती आणि नागरिकांनी शिक्षण,उद्योग,आरोग्य व राजकीय क्षेत्रात यश मिळविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.चाणक्य नीती वापरून 'चंद्रगुप्तां'चा शोध घ्या,असा सल्ला त्यांनी दिला.लिंगायत असल्यामुळेच मला खासदारकी मिळाली. समाजातून नेतृत्व घडविण्यासाठी, समाजाच्या विकासासाठीच माझी खासदारकी आहे.देशाचे भवितव्य तरुणांच्या हाती आहे.भविष्यात लिंगायत समाजाला विविध क्षेत्रात देशाचे नेतृत्व करण्याची संधी मिळणार असल्याचे ते म्हणाले.

यावेळी बोलताना डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी लिंगायत समाजासोबत आतापर्यंत बरेच काही घडले असल्याचे सांगितले. बुद्धीभेद हा राजकारणाचा मंत्र आहे.त्यापासून समाजाने सावध राहिले पाहिजे,असे त्या म्हणाल्या.

माधवराव पाटील टाकळीकर यांनी लिंगायत समाजाला समाजासाठी स्थापित महामंडळातील त्रुटी दूर कराव्यात आदी मागण्या केल्या.आदिनाथ सांगवे यांनी खा.डॉ. गोपखेडे यांना मंत्रीपद मिळेल,अशी सदिच्छा व्यक्त केली.

यात्रा संयोजक नितीन शेटे यांनी प्रास्ताविकातून यात्रेच्या आयोजनाचा हेतू विषद केला.प्रारंभी संस्थेच्या वतीने उपस्थितांचे स्वागत करण्यात आले.खा.डॉ. अजित गोपछडे यांनी आदिनाथ सांगवे, माधवराव पाटील टाकळीकर,विश्वस्त राजेश्वर बुके,बसवराज शेटे,बाबुराव तरगुडे,प्राचार्य संजय गवई,उपप्राचार्य संजय पवार,बालाजी जाधव आदींचा सत्कार केला.कार्यक्रमाचे सूत्रसंचलन रत्नाकर बेंडगे व राहुल डोंबे तर आभार प्रदर्शन संजय गवई यांनी केले.

चन्न बसवेश्वर बी फार्मसी महाविद्यालयात संस्था विश्वस्त सन्मान व प्राध्यापक संवादाचा कार्यक्रम संपन्न झाला.या कार्यक्रमास खा.डॉ. गोपछडे,डॉ.अर्चनाताई पाटील,श्रावण जंगम यांच्यासह संस्था सचिव भीमाशंकर देवणीकर, बाबासाहेब कोरे,उद्योजक श्रीकांत स्वामी यांची उपस्थिती होती.

तरुणांनी संशोधनाच्या क्षेत्रात काम करावे. संशोधनासाठी निधी देण्यास सरकार तयार आहे.संशोधनातूनच देश पुढे जाईल.या महाविद्यालयातील तरुणांनी संशोधन क्षेत्रात काम केले तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी भेट घालून देण्याचे आश्वासन त्यांनी दिले.संशोधनाच्या माध्यमातून आपण देशाची सेवा करू,असे ते म्हणाले.

या कार्यक्रमात खा.डॉ. गोपछडे यांनी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांचा सन्मान केला.विजयकुमार मठपती व यांनी प्रास्ताविक तर प्राचार्य संजय थोंटे यांनी आभार प्रदर्शन केले. महाविद्यालयातील प्राध्यापक,विद्यार्थी आणि समाज धुरिणांची यावेळी मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

कार्यक्रमापूर्वी बसवेश्वर चौकातील महात्मा बसवेश्वरांच्या पुतळ्यास डॉ.गोपछडे यांनी अभिवादन केले.तेथून ढोल–ताशांच्या गजरात ही यात्रा महाविद्यालयाकडे रवाना झाली.

## मुख्यमंत्रीपदाबाबत चर्चा करून निर्णय

नागपूर : सध्यस्थितीत एकनाथ शिंदे हे महायुती सरकारचे मुख्यमंत्री आहेत. पण पुढच्या काळात केंद्रीय नेतृत्व व राज्यातील तीनही नेते एकत्र बसून याबाबतचा निर्णय करतील. आम्हाला मुख्यमंत्रीपदाची घाई नाही. मुख्यमंत्रीपदासाठी कोणीच काम करत नाही, असे भाजपचे प्रदेश अध्यक्ष आ. चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केले. आता काँग्रेस आणि राष्ट्रवादी (शरद पवार) हे उद्धव ठाकरे यांचा चेहरा मान्य करण्यास तयार नाही. संजय राऊतांना रोज काहीतरी खोटे बोलायचे असते म्हणून ते बोलतात, अशी टीकाही त्यांनी केली. शुक्रवारी नागपुरात पत्रकारांशी बोलताना बावनकुळे म्हणाले, विधानसभा निवडणुकीसाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात आम्ही २१ लोक महाराष्ट्रात वेगवेगळ्या समित्यांमध्ये काम करणार आहोत. सगळ्या नेत्यांनी वेगवेगळी जबाबदारी घेतली आहे. भूपेंद्र यादव, अश्विनी वैष्णव प्रभारी आहेत. नितीन गडकरी यांनीही निवडणूक प्रचारासाठी एक महिना द्यावा, अशी विनंती त्यांना केली आहे. गडकरी महाराष्ट्राचे मोठे नेते गडकरी हे महाराष्ट्राचे मोठे नेते आहेत, ते जबाबदारीने पहिले पासून काम करत आहेत, ते आमच्या कोर कमिटीचे मेंबर आहेत, पार्लमेंटरी बोर्डाचे मेंबर आहेत, गडकरींना महाराष्ट्र हृदयाने प्रेम करतो, भारतीय जनता पक्षासाठी ते काम करणार आहे, एक वर्ग आहे, देशासाठी आदर्श आहेत लोकसभेत त्यांनी पंधरा दिवस महाराष्ट्राला दिले विधानसभेत एक महिना देतील, महाराष्ट्रासाठी नितीन गडकरी पूर्ण एक महिना देणार असल्याचे त्यांनी सांगितले.



## औसा विधानसभा मतदारसंघातील विविध राजकीय पक्ष व संघटनांच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांचा माजी मंत्री आ. अमित देशमुख यांच्या नेतृत्वात काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश

माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या हस्ते लातूर जिल्हा महिला काँग्रेस व लातूर जिल्हा ओबीसी काँग्रेस सेलच्या विविध पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. आमदार देशमुख यांनी नियुक्ती मिळालेल्या पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.



लातूर / प्रतिनिधी : – महायुती सरकारचा कारभार भ्रष्टाचाराने बरबटलेला आहे, पैसे दिल्याशिवाय सामान्य माणसाचे कोणतीही योजना आणि काम मिळत नाही, हे सरकार आता आपणाला उलथून टाकायचे आहे असे सांगून ते म्हणाले काँग्रेस महाविकास आघाडीच्या काळात सामान्य माणसाला न्याय मिळाला, आज सामान्य माणसाची पिळवणूक होत आहे, ती थांबविण्यासाठी महाविकास आघाडीचे सरकार निवडून आणायचे आहे असे राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख महणाले. राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत शुक्रवार दि. ६ सप्टेंबर रोजी दुपारी लातूर शहरातील काँग्रेस भवन येथे औसा विधानसभा मतदारसंघातील विविध पक्षातील व संघटनेतील नेते पदाधिकारी यांनी काँग्रेस पक्षामध्ये जाहीर प्रवेश केला. आमदार देशमुख यांनी सर्वांचे काँग्रेस पक्षात स्वागत करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. औसा विधानसभा मतदारसंघातील भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी अर्जुन निलेवाडे, दत्ता देवकते, संजय घोडके, सचिन रूबदे, गोविंद जाधव, तानाजी घोडके, परमेश्वर जाधव, सुमित जाधव, रतन निले, उत्तम जाधव, पांडुरंग शिंदे, सतीश माने, शिवसेना शिंदे गट पदाधिकारी जितेंद्र शिंदे, गोपाळ शिंदे, राजेंद्र सगर, ऋषिकेश गोगावकर, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षातील किरण कांबळे, प्रताप कांबळे, रासपचे तालुका अध्यक्ष विजयकुमार पाटील, वंचित बहुजन आघाडीचे विनोद टेंकाळे आदीसह विविध पक्षातील व संघटनेतील नेते पदाधिकारी शेकडो कार्यकर्त्यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. यावेळी लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्रीशैल उटगे, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सचिव अभय साळुंके, लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, औसा तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष दत्तोपंत सूर्यवंशी, औसा शहर काँग्रेसचे अध्यक्ष अजहर हाशमी, औसा विधानसभा युवक काँग्रेस अध्यक्ष मुकेश बिदादा, महाराष्ट्र प्रदेश महिला काँग्रेसच्या उपाध्यक्ष विद्याताई पाटील, लातूर जिल्हा महिला काँग्रेसच्या अध्यक्षा शीलाताई पाटील, अजित माने, आबासाहेब पाटील उजेडकर, सईताई गोरे, एकनाथ पाटील, सुभाष घोडके, विजयकुमार पाटील, प्रवीण सूर्यवंशी, प्रा.प्रवीण कांबळे बालाजी साळुंखे आदीसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की, औसा काँग्रेसचे बळकटीकरण होत आहे, काँग्रेस जिल्हाध्यक्ष श्रीशैल उटगे यांचे काम कौतुकास्पद आहे. औसा विधानसभा मतदारसंघात काँग्रेस पक्षाला जिवंत ठेवण्याचे काम ते करत आहेत, महायुतीच्या कारभाराला कंटाळून त्यांचे पदाधिकारी काँग्रेस पक्षात प्रवेश करत आहेत, या सरकारचे दिवस आता भरले आहेत हे सरकार प्रत्येकस्तरावर अपयशी ठरत आहे. केंद्र व राज्य सरकार शेतकरी व युवक विरोधी धोरणे राबवते शेतकरी कर्जबाजारी होत आहेत त्यांच्या आत्महत्या वाढत आहेत लोकसभेला जनतेने महायुती सरकारला धडा शिकवला त्याप्रमाणे विधानसभेलाही त्यांना धडा शिकवतील असे त्यांनी सांगितले. पुढे बोलताना ते म्हणाले की, आता विधानसभेच्या कामाला लागायचे आहे, महायुती सरकारचा कारभार भ्रष्टाचाराने बरबटलेला आहे, पैसे दिल्याशिवाय सामान्य माणसाचे काम होत नाही, हे सरकार आता आपणाला उलथून टाकायचे आहे. काँग्रेस महाविकास आघाडीच्या काळात सामान्य माणसाला न्याय मिळाला, आज सामान्य माणसाची पिळवणूक होत आहे आपणाला महाविकास आघाडीचे सरकार निवडून आणायचे आहे. स्वातंत्र्याच्या काळापासून औसा मतदारसंघात काँग्रेसने सर्वाधिक निवडणुका जिंकल्या आहेत, सत्ताधाऱ्यांच्या पाच वर्षातील कामाची पोलखोल कार्यकर्त्यांनी करावी महायुती सरकारच्या कारभारात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळतो महिलांवर अत्याचार होत आहेत बेकारी वाढत आहे शेतीमालाला भाव मिळत नाहीत काँग्रेस पक्षाने लातूर जिल्ह्यात उद्योग उभारले महायुती सरकारच्या काळात येथे एकही नवा उद्योग आला नाही असे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक औसा तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष दत्तोपंत सूर्यवंशी यांनी केले तर मनोगत लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्रीशेल उटगे यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ओमप्रकाश झुरळे यांनी केले तर शेवटी आभार प्रशांत भोसले यांनी मानले.


दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# चेहऱ्यावर चर्चा

महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक अद्याप जाहीर झालेली नाही. ती नोव्हेंबर महिन्यात होऊ शकते अशी अटकळ आहे. तीन पक्षांचा एक गट अशी दोन गटांमध्ये चुरस आहे. कोणत्या गटाची म्हणजे आघाडीची अथवा युतीची सरशी होणार यावर चर्चा कमी, तर मुख्यमंत्री कोण होणार यावर चर्चेचा भर अधिक आहे. याची सुरुवात उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेने केली. त्याला आता काही दिवसांचा पॉज घेऊन अगोदर शरद पवार यांच्या राष्ट्रवादीने उत्तर दिले. पवारांच्या उत्तराचीच री काँग्रेसने ओढली आहे. ती त्या पक्षाच्या प्रकृतीला साजेशी अशीच आहे. चेहर्यावर आता चर्चा नको, निवडणूक झाल्यावर ते बघू, असा स्पष्ट संदेश आहे व तो उद्धव ठाकरेंना दिला गेला. त्यानंतर ठाकरे गटाचा सूरही काहीसा मवाळ झाला आहे. तरीही राज्याचे नेतृत्व कोण करणार, हा प्रश्न कायम आहेच. तो केवळ महाविकास आघाडीपुरता नाही, तर महायुतीच्या संदर्भातही लागू होतो. राज्याच्या राजकारणात पहिल्यांदाच अशी वेगळी लढत होते आहे. त्यात दोन शिवसेना, दोन राष्ट्रवादी परस्परांना आव्हान देत आहेत. लोकसभेलाही लढत झाली होती. पण त्यावेळी दिल्लीचे कारभारी निवडायचे होते. आता निवड राज्यातील कारभार्यांची आहे. या चार पक्षांखेरीज भारतीय जनता पार्टी आणि काँग्रेस हे पारंपरिक प्रतिस्पर्धी आहेतच, शिवाय लहानसहान पक्षांचीही तिसर्या आघाडीची जुळवाजुळव सुरू आहे. या पार्श्वभूमीवर आपल्याला किंवा आपल्या आघाडीला किती जागा मिळतात आणि आपण किती जागा जिंकू ते नंतर पाहता येईल. अगोदर जिंकलो तर मुख्यमंत्र्याच्या खुर्चीवर कोण बसणार याचा चेंडू रिंगणात टाकण्यात आला. ठाकरे गटाचे संजय राऊत यांनी त्यांच्या रोजच्या वार्तालापात खूप पूर्वीच या विषयाला तोंड फोडले. मध्यंतरी उद्धव ठाकरे यांचा दिल्ली दौराही झाला. उद्धव स्वत: त्यांच्या सेनेचे श्रेष्ठी असल्यामुळे त्यांनी दिल्लीला जाण्याचे काही कारण नव्हते. तरीही ते दिल्लीला गेले, काँग्रेसच्या हायकमांडला भेटले. मुख्यमंत्रिपदासाठी पुन्हा ठाकरे यांचाच चेहरा पुढे करण्याच्या संदर्भात ही चाचपणी होती. किंबहुना ठाकरे गटाकडून तशी मागणी किंवा संकेतच दिल्लीत काँग्रेस हायकमांडला दिले गेले, असेही म्हटले जाते. राजकीय चर्चा, त्याही भविष्यातील घडामोडींच्या संदर्भात असल्या की त्या क्वचित बाहेर समजतात. जे समजते तेही अर्धसत्य असते. उद्धव यांनी जरी त्यांची इच्छा अथवा आकांक्षा प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष व्यक्त केली असली, तरी काँग्रेस अशा उतावळेपणावर विश्वास ठेवत नाही. त्यांना स्वत:ला स्पष्ट बहुमत मिळाले असले, तरी काँग्रेस त्यांच्या प्रक्रियेनुसार दोन निरीक्षक राज्यात पाठवून, सर्व विजयी आमदारांशी चर्चा करून आणि सर्वाधिकार सोनिया गांधी अथवा राहुल गांधी यांच्याकडे सोपवण्याचा ठराव संमत करून आपले सोपस्कार पार पडत असते. आताही त्यापेक्षा वेगळे काही होणार नाही. उलट यावेळी काँग्रेससोबत दोन आणखी तुल्यबळ पक्ष सत्तेत वाटेकरी असणार आहेत. त्यामुळे काँग्रेस सर्व असलेले नसलेले पर्याय तपासूनच कोणत्या एका बाबीला हिरवा कंदील देईल. आताच्या महायुतीच्या सरकारच्या अगोदर महाआघाडीचेच सरकार होते अन् ते कोणत्याही कुरबुरीविना चालले असे म्हणता येऊ शकते. मात्र, महाविकास आघाडी स्थापन झाली त्यावेळेची आणि आताची परिस्थिती वेगळी आहे. तेव्हा उद्धव यांची शिवसेना दुभंगली नव्हती. काँग्रेस गेल्या दहा वर्षांपासून केंद्र आणि राज्य या दोन्ही ठिकाणाहून सत्तेच्या बाहेर गेल्यामुळे शक्तीहीन झाली होती. अनेक दिग्गज भासणार्या नेत्यांनीही काँग्रेसची साथ सोडली होती. राष्ट्रवादी काँग्रेस एकसंध आणि आपले ५० आमदार निवडून आणण्याची ताकद टिकवून होती. राहुल यांच्या भारत जोडो यात्रेचा लाभ आणि केंद्रातील भाजप सरकारच्या विरोधात शेतकरी आणि अन्य विषयांवरून निर्माण झालेली नाराजी यामुळे काँग्रेसला अत्यावश्यक असलेला बूस्टर मिळाला. मागच्या निवडणुकांमध्ये चौथ्या क्रमांकावर फेकली गेलेली काँग्रेस लोकसभा निवडणुकीत पहिल्या स्थानावर आली आहे. दिल्लीतही लोकसभेत काँग्रेसने शंभरी गाठली. राहुल गांधी त्यांच्या राजकीय कारकिर्दीत प्रथमच लोकप्रियतेच्या बाबतीत शिखरावर पोहोचले आहेत. 'मूड ऑफ नेशन' नावाच्या एका सर्वेक्षणात हे सिद्धही झाले आहे. या सगळ्या घटनाचक्रात निवडणुकीच्या अगोदरच उद्धव ठाकरे अथवा संजय राऊत यांनी कितीही मागणी केली, तरी मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार काँग्रेस पक्षाकडून जाहीर केला जाण्याची शक्यता नव्हतीच. त्या पक्षाच्या अंतर्गत सर्वेक्षणात काँग्रेसला ८० ते ९० च्या दरम्यान जागा मिळतील असे संकेत मिळत आहेत. याचा अर्थ महाविकास आघाडीत व बहुदा राज्यातही काँग्रेसच पहिल्या क्रमांकाचा पक्ष ठरणार आहे. उद्धव यांची सेना पुन्हा भाजपकडे गेलीच तरच ते बहुमताच्या जवळपास कदाचित जातील. त्याचीही शक्यता नाही. त्यामुळे काँग्रेसलाच संधी आहे व याची त्यांना खात्रीही असल्यामुळे ते त्यांच्या स्वभावधर्मानुसार 'थंडा करके खाओ' याच नीतीचा अवलंब करतील. काँग्रेस नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी साधारण महिनाभरापूर्वी तेच स्पष्ट केले होते. काल प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी तेच सांगितले आणि त्या अगोदर राष्ट्रवादीचे शरद पवार तेच म्हणाले. चेहर्यावर आता चर्चा करण्यापेक्षा आपली संख्या मग ती आघाडीची किंवा वैयक्तिक यावर अधिक भर देण्याचा पवार गटाचा आणि काँग्रेसचा प्रयत्न आहे.

# महार विरुध्द मातंग यांच्यातील पूर्वापार वैरभाव.

आजकालच्या राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांना सामाजिक चळवळीत वावरणाऱ्या आंबेडकरी समाजाला कदाचित माहीत नसेल की,महार व मातंग पूर्वीपासून एकमेकांचे वैरी आहेत. अनुसुचित जाती प्रवर्गात उपवर्गीकरणाची मागणी करण्यामागे मातंग समाजाचा कदाचित हाच वैरभाव असू शकतो! १.मातंग पेशव्यांसोबत तर महार पेशव्यांच्या विरोधात अ) लहुजी राघोजी साळवे: शनिवारवाड्यावर पुन्हा भगवा झेंडा उभारेन,असं म्हणणारे शूरवीर!.१८१८ साली पेशवाईचा शेवट झाला.त्या अखेरच्या लढाईमध्ये लहुजी राघोजी साळवे यांच्या वडिलांना युद्धभूमीवर वीरमरण आले.

१८१८ सालापासून १८८१ पर्यंत भारतीय स्वातंत्र्य लढ्याकरिता सशस्त्र सेना घडवणारे एक धडाडीचे नेतृत्व/ वस्ताद म्हणून पुण्यामध्ये ज्यांनी कार्य केले त्या आद्य क्रांतिगुरू वीर लहुजी राघोजी साळवे अर्थात लहुजी वस्ताद यांचा जन्म १४ नोव्हेंबर १७९४ रोजी पुरंदर किल्ल्यानजीक पेठ या गावी झाला.लहुजींचे वडील राघोजी हे पेशव्यांच्या शिकारखान्याचे प्रमुख होते.यांचे मूळ गाव भिवडी.पुरंदर किल्ल्याच्या रक्षणार्थ साळवे परिवाराने दाखविलेल्या मर्दुमकीचा सन्मान म्हणून त्यांना छत्रपती शिवाजी महाराजांनी राऊत ही पदवी देऊन गौरविले.१८१८ साली पेशवाईचा शेवट झाला.त्या अखेरच्या लढाईमध्ये लहुजी राघोजी साळवे यांच्या वडिलांना युद्धभूमीवर वीरमरण आले. पुण्यातील मांगीरबाबाची समाधी हे त्यांचे स्मृतीस्थळ म्हणून ओळखले जाते.ह्या ठिकाणी लहुजी वस्ताद यांनी शपथ घेतली की या शनिवारवाड्यावर पुन्हा भगवा झेंडा ऊभारेन! असे हे शूर लहुजी वस्ताद! दिनांक १७ फेब्रुवारी १८८१ रोजी झाले.पुण्यातील संगमपुलावर आद्य क्रांतिगुरू लहुजी वस्ताद यांची समाधी असून भविष्यकाळात तेथे भव्य असे स्वातंत्र्यलढ्याचे पंचतीर्थ स्मारक उभारण्यात येणार आहे. ब) महार व पेशवे यांच्यातील १८१८ ची भीमा कोरेगाव लढाई.महार समाजाचा समावेश असलेल्या तुकडीनं मराठ्यांना नाही तर ब्राह्मणांना नमवलं होतं.ब्राह्मणांनी जबरदस्तीनं अस्पृश्यता लादल्यानं महार समाज नाराज होता. ही अनिष्ट पद्धत बंद करण्याबाबत महार समाजानं ब्राह्मणांना सांगितलं. मात्र त्यांनी ऐकलं नाही.या कारणामुळेच महार समाजानं ईस्ट इंडिया कंपनीच्या तुकडीत सामील होण्याचा निर्णय घेतला. ब्रिटिश सैन्यानं महार समाजातील व्यक्तींना लष्करी प्रशिक्षण दिलं आणि पेशव्यांविरुद्ध लढण्याची प्रेरणा दिली.मराठा शक्तीच्या नावावर ब्राह्मणांची पेशवाई होती, त्याविरुद्धची ही लढाई होती.महारांनी या लढाईत ब्राह्मणांना हरवलं. ही लढाई महार समाजाची मराठ्यांविरुद्धची लढाई कधीच नव्हती. महार आणि मराठा यांच्यादरम्यान मतभेद किंवा संघर्ष कधीच नव्हता.इतिहासात अशा वादावादाची उदाहरणंही नाहीत.ब्राह्मणांनी अस्पृश्यतेची प्रथा बंद केली असती तर ही लढाई कदाचित झालीच नसती, मराठ्यांचं नाव घेतलं जातं कारण मराठ्यांचं राज्य पेशवाईत ब्राह्मणांच्या हाती होतं. ही लढाई म्हणजे पेशव्यांची शेवटची मोठी लढाई होती. ब्रिटिशांना त्यांना नमवायचं होतं. म्हणूनच ब्रिटिशांनी महार समाजातील व्यक्तींना हाताशी घेतलं आणि पेशवाई संपुष्टात आणली. २) महार जातीवरील आप्पलपोटेपणाचा आरोप निराधार. बुधवार ता. २० जुलै १९२७ रोजी सायंकाळी साडे सात वाजता पुणे येथील मांगवाड्यात पुण्याच्या दीनबंधू पत्राचे संपादक डॉ.नवले यांच्या अध्यक्षतेखाली अस्पृश्य लोकांची जाहीर सभा भरली होती.त्यावेळी अस्पृश्य आणि स्पृश्य वर्गांतील सुमारे ३०० मंडळी हजर होती. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे आपल्या भाषणात म्हणाले,मी आज मन मोकळे करून बोलणार आहे.माझ्या भाषणाचा कोणीही.विपर्यास करू नये.मि. सकट आणि मि.वायदंडे यांनी सध्या माझ्यावर.विनाकारण टीका सुरू केली आहे. पुढाऱ्यांवर नेहमी टीका व्हायचीच हे मी जाणून आहे.मी महार जातीचा आहे.हे आपणास माहीतच आहे.महार-जात स्वार्थी आहे हे टीकाकारांचे म्हणणे आहे.परंतु अस्पृश्य वर्गाच्या महारेतर जातीतील पुढाऱ्यांनी महारांकरीता नि:स्वार्थीबुद्धीने काम केले आहे काय? असा माझा त्यांना उलट स्पष्ट सवाल आहे. वास्तविक पाहता,महारेतर जातीच शैक्षणिक आणि सांपत्तिकदृष्ट्या श्रेष्ठ आहेत.मुंबईत तर चांभार व ढोर जातीतील काही गृहस्थ इन्कम टॅक्स देण्याइतके सधन आहेत.असे असताना त्यांनी महार लोकांच्या उन्नतीप्रित्यर्थ काही प्रयत्न केल्याचे माझ्या ऐकिवात नाही.उलटपक्षी आम्ही अनेक उपयुक्त संस्था काढून नुसत्या महार जातीच्याच नव्हे तर अस्पृश्यातील सर्व जातींच्या उन्नतीकरिता काया-वाचा-मने झटत आहोत. ३) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना पाठविलेले दे.ना.कांबळे (मातंग) यांचे पत्र पाथ्री : ३०-५-१९४१ परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांस देवीदास बुवा पाथ्रीकर याचा सादर प्रणाम वि.वि.लिहिण्यास कारण की,आपणांस पत्र पाठवून पूर्ण खुलासा करून घेण्याचा, माझ्या मनात बऱ्याच दिवसांपासून विचार आहे.याबद्दलचा सोक्षमोक्ष तो काय आताच करून घ्यावा व मनातील खुडखुडी काढून टाकावी असे वाटले म्हणून आपणास हे पत्र पाठवीत आहे.हे पूर्ण वाचून विचार करून आपले खरें उत्तर देणे. मी निजाम इलाख्यातील मराठवाडा भागातील मातंग समाजातील शिकलेला पहिला विद्यार्थी असून मातंग समाजातील सुधारणेची सर्वस्वी जबाबदारी माझ्या शिरावर आहे. मी आपणास सामान्य विद्यार्थी या नात्याने पत्र पाठवीत नसून निजाम स्टेटच्या मातंग समाजाचा भावी पुढारी म्हणून पत्र पाठवित आहे.म्हणून आपण उत्तर देण्यास अनमान करू नये.मातंग समाज व महार समाज यांमध्ये देव-दानवासारखे हाडवैर आहे व आपसात वैर,तिरस्कार,द्वेष,मत्सर आणि वाईट भावना आहेत.श्रद्धेने व अज्ञानाने महार समाज आपणास ईश्वरी अवतार मानून आपल्या फोटोचे पूजन करतात व आपणा शिवाय दुसरा कोणी होणारच नाही असा बुद्धीमंतास वाव न देणारा समज करून घेतात,तो मला पसंत नाही व हे अंधश्रद्धेचे व भोळेपणाचे अनुकरण मी मातंग समाजास करू देणार नाही. आपला, कृपाभिलाषी, देवीदासराव नामदेवराव कांबळे हेच देवीदासराव नामदेवराव कांबळें १९५७ च्या लोकसभा निवडणुकीत नांदेड मतदारसंघातून काँग्रेस पक्षाचे उमेदवार निवडून आले होते. त्यांनी शेकाफेचे सोनुले हरिहर राव यांचा पराभव केला होता. ४) मातंग समाजाचे क्रांतीवीर डॉ.बाबासाहेब गोपले यांनी मातंग समाजामध्ये जागृती घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले. १९८२ मध्ये 'अखिल भारतीय मातंग संघ' स्थापला. 'मांग' हा शब्द दूर सारून 'मातंग' हा शब्द स्वीकारला. मातंग समाजाच्या चळवळीचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण करण्यासाठी डॉ.गोपले यांनी पुढाकार घेतला.त्यातून सरकारने 'अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ' निर्माण केले.मातंग समाजामध्ये परिवर्तन व्हावे यासाठी डॉ.गोपले यांनी विविध उपक्रम राबविले.मातंग समाजाच्या स्वतंत्र आरक्षणाची मागणी केली.प्रस्थापित सत्तेला म्हणजे काँग्रेसला डॉ. गोपले यांचा अडसर वाटणे साहजिक होते. 'क्रांतीवीर लहूजी साळवे मातंग अभ्यास आयोग' स्थापून त्यांना उपाध्यक्ष केले. मंडळे स्थापन करून नेत्यांना शांत करणे आणि चळवळीची धग कमी करणे हे जुने शस्त्र या वेळीही उपयोगी पडले. काही एक तत्त्वाला धरून चळवळ जर वाढली नाही तर ती लगेच संपुष्टात येते.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी उभारलेली व्यापक चळवळ आणि तिचा पाया मातंग चळवळीने स्वीकारला असता तर डॉ.बाबासाहेब गोपले यांना प्रचंड मोठे यश आले असते. गोपले यांचे २१ ऑगस्ट २०२१ ला निधन झाले. ५) लहुजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोग,२००३ डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मागासवर्गीयांसाठी शैक्षणिक सुविधांबरोबरच नोकऱ्यात १३ टक्के आरक्षण ठेवण्याची तरतूद केली. बाबासाहेबांच्या प्रेरणेने बौध्द समाजाने शिक्षण घेतले. स्वाभाविकपणेच आरक्षणाचा लाभ त्यांना बऱ्यापैकी झाला; पण मातंग समाज मात्र त्यांच्यातील जागृती अभावी मागे पडला.मातंग समाजाचे आर्थिक मागासलेपण पाहता या समाजातून मातंग समाजाला लोकसंख्येच्या प्रमाणात नोकऱ्यात ५ टक्के स्वतंत्र आरक्षण मिळाले पाहिजे,अशी मागणी करण्यात येऊ लागली.या पार्श्वभूमीवर माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या कार्यकाळात २००३ मध्ये लहुजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोगाची स्थापना करण्यात आली. ह्या आयोगाने २५० पानी अहवाल नुकताच महाराष्ट्र शासनास सादर केला असून या अहवालाचे लेखन डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील राज्यशास्त्र विषयाचे प्राध्यापक डॉ.बी.एस.वाघमारे यांनी केले आहे. या आयोगाने जवळपास ८० शिफारशी केल्या असून त्यातील प्रमुख शिफारस म्हणजे मातंग समाजाला नोक-यांत लोकसंख्येच्या प्रमाणात ५ टक्के स्वतंत्र आरक्षण मिळावे,ही आहे.



ह्या संदर्भात आयोगाने शासनाच्या निदर्शनास असे आणून दिले की,पंजाब,हरियाणा, आंध्र प्रदेशात एस.सी.साठी असलेल्या आरक्षणात मागे राहिलेल्या दलित जातींसाठी स्वतंत्र आरक्षण ठेवले आहे,याच धर्तीवर महाराष्ट्रात मातंग समाजासाठी स्वतंत्र आरक्षणाची तरतूद करण्यात यावी; पण यातील कायदेशीर अडचण अशी की,स्वतंत्र आरक्षण देता येत नाही,असा निकाल न्या.स्वतंत्र हेगडे यांच्या नेतृत्त्वाखालील पाच जणांच्या खंडपीठाने दिला आहे.आंध्र प्रदेशातील एका व्यक्तीने आरक्षणासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या खटल्यात हा निकाल देण्यात आला.परिणामी, आपोआपच पंजाब,हरियाणा,आंध्र प्रदेशातील स्वतंत्र आरक्षणाची तरतूद रद्द झाली. सर्वोच्च न्यायालयाचा हा आदेश प्रमाण मानून महाराष्ट्र सरकारने अलीकडेच मातंग समाजाची स्वतंत्र आरक्षणाची मागणी फेटाळून लावली; पण मातंग समाजाच्या अन्य विकासविषयक प्रश्नांकडे लक्ष देण्यात येईल, असे सांगण्यास सरकार विसरले नाही! ६) अण्णा भाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था (आर्टी) २०२४. राज्यातील मातंग समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक,आर्थिक,सांस्कृतिक व राजकीय असा सर्वांगीण विकास करण्यासाठी शासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे या संस्थेच्या धर्तीवर मातंग समाजासाठी अण्णा भाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था (आर्टी) कंपनी नोंदणी कायदा २०१३ अंतर्गत नियम ८ नुसार स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे.त्या बाबतचा सामाजिक न्याय विभागाचा दिनांक १६ जुलै २०२४ शासन निर्णय प्रसिध्द करण्यात आला आहे.दिनांक १ ऑगस्ट २०२४ रोजी सर्वोच्च न्यायालयाने डउ व डढ प्रवर्गातील लाभार्थींचे अबकड उपवर्गीकरण करावे व लीशरूश्रररूशी चे निकष लावावेत असे मत व्यक्त केलेले आहे, हा निकष लावा असे स्पष्ट निर्देश दिलेले नाहीत. राज्य सरकारला हे बदल करण्यासाठी प्रथम शाशीळलरश्र वरींर गोळा करावे लागेल व तशी राज्यपालांची मंजुरी घ्यावे लागेल. ७) मातंग समाजाची सामाजिक चळवळ. मातंग समाजाला खरे तर एक सामाजिक चळवळीची परंपरा आहे. ह्या समाजातील कोंडिबा काशीनाथ सकट,तात्या साधू गायकवाड,कोंडिबा रणदिवे,तुकाराम काळोखे, जी.बी.माने आदी कार्यकर्ते मातंग समाज जागृतीच्या चळवळीत आघाडीवर होते. तुकाराम काळोखे,एम.व्ही.दोंदे,सीताराम बावाजी लांडगे हे कार्यकर्ते तर बाबासाहेबांच्या बरोबरच होते. अण्णाभाऊ साठे,शाहीर विठ्ठल उमप हे आंबेडकरांचे चाहते होते. नामांतर आंदोलनात पोचीराम कांबळे हा तरुण शहीद झालेला आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मातंग समाजाविषयी आस्था होती. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी मातंग समाजाला जागृत करण्यासाठी १ जानेवारी १९३८ रोजी सोलापूर येथे मातंग परिषद घेतली होती. डॉ.बाबासाहेब आंबेडकरानी केवळ बौध्दच नव्हे,तर त्यांच्या बरोबर मातंग समाजालाही बरोबर घेऊन त्यांचा विकास साधण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला.सवलती सर्वच मागास जातींना मिळवून दिल्या;पण तरीही मातंग समाज मागेच राहिला. ८) धर्मांतरानंतर चांभार व मातंग समाजाची आंबेडकरी चळवळीशी फारकत. खरंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ ऑक्टोबर, १९५६ हिंदू धर्माचा त्याग करुन बौध्द धम्माचा स्वीकार केल्यानंतर बाबासाहेबांसोबत असलेल्या प्रामुख्याने चांभार व मातंग समाजाने आंबेडकरी चळवळीशी फारकत घेतली. बहुतेक चांभार व मातंग समाजातील आरक्षण लाभार्थी स्वत:च्या घरांत बाबासाहेबांचा फोटो लावत नाहीत. चांभार व मातंग समाजाचे लोक बौध्द उमेदवारांना मते देत नाहीत.सर्व अनुसूचित जाती व जमातींना चातुर्वर्ण्य,जातीभेद व अस्पृश्यता हा ज्या धर्माचा पाठीचा कणा आहे, तो हिंदू धर्म त्यांना प्रिय होता व आहे.म्हणूनच काही सन्माननीय अपवाद वगळता बाबासाहेबांसोबत अनुसूचित जाती व जमातींच्या समुहांनी धर्मांतर केले नाही. ही वस्तुस्थिती आहे.चांभार व महार यांच्यातील फरक आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांना समजलेला नाही चांभार स्पृश्य आहेत तर महार अस्पृश्य आहेत.ही भावना चांभार समाजाच्या मनातून अजुनही गेलेली नाही.चांभार समाज महार (बौध्द) समाजाचा कमालीचा तिरस्कार करतो,काही सन्माननीय अपवाद असतील.हे अण्णाभाऊ साठे यांची उपकाराची फेड नावाची कथा वाचल्यावर लक्षात येते.जरी चांभार व मातंग बौध्द समाजाच्या तुलनेने शासकीय सेवांत कमी असले तरी त्यांचे मंत्री आहेत,आमदार खासदार बहुसंख्य आहेत,हे राजकारण बौध्द समाजाने त्यांच्याकडून शिकण्यासारखे आहे!

***************

शरद आढाव,=९८३३१७५६६९,
राजपत्रित अधिकारी (सेवानिवृत.)
महाराष्ट्र शासन,मुंबई.

# निसर्ग मित्र गिधाड यांची घटती संख्या चिंताजनक.

दरवर्षी, सप्टेंबर महिन्यातील पहिला शनिवार आंतरराष्ट्रीय गिधाड जागरूकता दिवस म्हणून साजरा केला जातो. त्या अनुषंगाने यावर्षी ७ सप्टेंबर २०२४ ला या वर्षी आंतरराष्ट्रीय गिधाड जागृता दिवस साजरा केला जात आहे.हा एक जागतिक उपक्रम गिधाडांच्या संरक्षणासाठी समर्पित आहे, जी आपल्या पर्यावरणातील नायक आहेत. हे उल्लेखनीय पक्षी, अनेकदा गैरसमज आणि नकारात्मक अर्थांशी संबंधित, त्यांच्या अधिवासात अनेक धोक्यांचा सामना करतात व मानव आणि पशुपक्ष्यांच्या कल्याणासाठी कार्य करीत असतात. देशात दिवसेंदिवस सर्वच स्तरातून प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढत आहे.अत्याधुनिक साधनसामग्री, कारखाने, जंगल तोड, ज्वालामुखीचा उद्रेक, सुनामी,वाढते औद्योगिकीकरण यांमुळे आकाश-पाताळ-पृथ्वी-निसर्ग पुर्णपणे अत्यंत कठीण परिस्थितीमध्ये येवुन ठेपला आहे.यामुळे सर्वत्र मोठ्या प्रमाणात प्रदुषण दिसून येते.मृत जनावरांचे मांस खाऊन निसर्गाचे मानवजातीचे संतुलन सुरक्षित ठेवण्याचे काम मुख्यत्वेकरून गिधाडांचे आहे.त्यामुळे गिधाड आपली भूमिका चोखपणे बजावून निसर्ग निरोगी ठेवून पृथ्वीचे रक्षण करून सर्वांचे संरक्षण गिधाड करायचे व करीत आहे.परंतु भारतासाठी धक्कादायक बातमी म्हणजे भारतातील ९० टक्के गिधाडांची संख्या घटल्याने भारतीय निसर्गावर मोठे संकट आल्याचे दिसून येते.यासाठी आजच्या परिस्थितीत गिधाडांना वाचवीने काळाची गरज आहे.याच माध्यमातून गिधाडांचे संरक्षण करण्यासाठी अनेक संस्था पुढे सरसावल्या आहेत. गिधाडांना मृत्यूच्या खाईत लोटण्याचे काम मानवजातीनेच केले आहे.भारतात ६ भारतीय व ३ स्थलांतरित अशा ९ प्रजातीच्या गिधाडांचे अस्तित्व आहे.१९८०च्या दशकापर्यंत देशात गिधाडांची संख्या ४० दशलक्ष पेक्षा जास्त होती.मात्र डायक्लोफेनॅक सारख्या विषारी औषधांमुळे अवघ्या १५-२० वर्षात ९० टक्के गिधाडे संपली ही बाब निसर्ग संरक्षणाच्या दृष्टीने धोक्याची घंटा आहे. काही प्रजातीतर नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत.त्यामुळे मृत जनावरांचे मांस खाऊन निसर्गाचे संतुलन निरोगी ठेवणाऱ्या या निसर्ग मित्रालाच आता वाचविण्याची वेळ आली आहे.२५-३० वर्षापुर्वी गिधाड मृत जनावरांचे जे मांस खायचे ते त्यांना पोषक व आहार युक्त होते.परंतु आधुनिक युगात गेल्या काही वर्षांपासून जनावरांना अनेक रोगांपासून वाचविण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारची औषधे व इंजेक्शन देऊन त्यांचे प्राण वाचवले जाते. काही जनावरांना प्रजननासाठी व दुधाची मात्रा वाढवीण्यासाठी मोठ्या प्रमाणात औषधांचा व इंजेक्शनचा वापर होतांना दिसतो व होत आहे.परंतु यांचा विपरीत परिणाम निसर्ग संरक्षक गिधाड याला भोगावा लागत आहे.कारण जी औषधे जनावरांना देण्यात येते ती औषधे जनावरे मृतपावल्यानंतर विषेली होतात.ही मृत जनावरे गिधाड खातात व त्यांना अनेक रोगांच्या यातना भोगुन मृत्यूशी झुंज द्यावी लागते.यामुळेच आज निसर्ग मित्र गिधाड यांची संख्या ९० टक्याने घटल्याचे दिसून येते.ही अत्यंत चिंतेची आणि गंभीर बाब आहे.एका माहितीनुसार १९९३ ते २००७ दरम्यान भारतीय प्रजाती असलेल्या पांढऱ्या पुठ्याचे गिधाडांची संख्या ९९.९ टक्के नष्ट झाली आहे.याशिवाय भारतीय गिधाड व निमुळत्या चोचीचे गिधाड या प्रजातींची ९९ टक्के संख्या कमी झाली आहे.म्हणजेच निसर्ग सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीने गिधाडांची संख्या कमी होने अत्यंत चिंताजनक बाब आहे.त्यामुळे गिधाडांच्या बहुतेक प्रजाती नामशेष होण्याची भीती पहाता; भारतीय निसर्ग मित्राला वाचविण्याची काळाची गरज आहे.२०२० ते २०२५ पर्यंतच्या भारतातील गिधाड संवर्धनाच्या कृती आराखड्यानुसार भारतीय गिधाड फाउंडेशनच्या सहकार्याने महाराष्ट्र वनविभाग गिधाड संवर्धन प्रजनन केंद्रे स्थापन करण्यासाठी प्रयत्न करणार आहे.ही अत्यंत आनंदाची बाब आहे याचे मी मनापासून स्वागत करतो.आंतराष्ट्रीय गिधाड जनजागृती दिनाचे औचित्य साधून निसर्ग मित्र गिधाड यांना वाचविण्यासाठी भारत सरकारने प्रयत्न करावेच सोबतच संपूर्ण राज्य सरकार व केंद्र शासीत प्रदेशातील वनविभागाने गिधाडांना वाचवीन्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न करण्याची नितांत गरज आहे.यामुळे निसर्ग प्रफुल्लित रहाण्यास मोठी मदत होईल व सोबतच प्रदूषणावर सुध्दा मात करण्यास आपल्याला यश प्राप्त होईल.

*******

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर

# निषेध...निषेध...निषेध

महाराष्ट्र राज्याच्या मुख्य सचिव असलेल्या सुजाता सौनिक यांना मुख्य सचिव पदावरून हटवण्याच्या हालचाली सरकारकडुन सुरू झाल्या आहेत यात एक तर सुजाता सौनिक यांनी स्वतः हुन स्वेच्छा निव्रत्ती घ्यावी किंवा राज्याच्या निवडणूक आयोगाच्या मुख्य पदावर जावं मात्र सुजाता सौनिक यांनी या दोन्हीही ऑफर नाकारल्या आहेत कारण एक तर श त्या २०२५मध्ये म्हणजे एक वर्षाने निव्रत होणार आहेत आणि दुसरं म्हणजे मुख्य सचिव पदावरून साईड पोस्टवर जाणं महाराष्ट्राच्या मुख्य सचिव पदावर पोहचणार्या सुजाता सौनिक या बौद्ध आहेत याही पेक्षा त्या महिला आणि संवैधानिक प्रक्रियेने कर्तव्य बजावणार्या अधिकारी आहेत मग एवढ्या मोठ्या पदावर आणि पहिल्या महिला मुख्य सचिव म्हणुन निवड झालेली असताना त्यांच्यावर अशा पद्धतीने का प्रेशर आणलं जातयं तर याला कारण ही तसच आहे यात राज्यात गाजत असलेली लाडकी बहीण योजना.जी की येत्या ऑक्टोबर नंतर म्हणजे जानेवारी की काय या दरम्यान लागणारी विधानसभा निवडणुक डोळ्यांसमोर ठेवून जाहीर केली आहे आणि या योजनेतील महिलांना १५००रूपये महिनाही सुरू झालाय.ही योजना सरकारच्या तिजोरीतुन सुरू केलीय.पण राज्यातील महिलांची संख्या बघता लाडक्या बहिणीसाठी बजेट कमी पडत आहे.आणि मग पाण्याआधी वळण बांधायच्या ऐवजी पाणी आल्यावर बांध फोडु पहाणारे अन बजेट वळविण्यात महारथ हासिल करणारे दादा लोकं अर्थात तिन तिघाडे अन नव बिघाडेयांनी वेगवेगळ्या डिपार्टमेंटचं बजेट लाडक्या बहिणीकडं वळवण्याचे प्रयत्न सुरू केलेत

यात खास करून सामाजिक न्याय विभागातील म्हणजे बार्टी,सारथी,आर्टी महिला बाल कल्याण मधील एकात्मिक बालविकास या योजनेतील पोषण आहार,राशन या वेगवेगळ्या योजनेतील बजेट एकट्या लाडकी बहिण योजनेत वळवत आहेत ज्याला सुजाता सौनिक यांनी स्पष्टपणे नकार दिला आहे आणि हा मुद्दा सरकार पक्षातील मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री ग्रहमंत्री यांना सहन होत नसल्याने आणि येत्या तिन चार महिन्यात निवडणुकीच्या तोंडावर लाडक्या बहिणींच्या बजेटचे वांधे होऊन ऐन निवडणुकीत मताच्या बाबतीत 'वासलीचा बाजार' होईल म्हणुन सुजाता सौनिक यांची वरील दोन्ही पैकी एक कारण देऊन ऊचलबांगडी करत त्यांच्या फेवर मधील अधिकार्यांची तिथे वर्णी लावत जनतेच्या विकासासाला चुना लावत पिडीतांचे हक्क मारत पुन्हा सत्तेवर यायचं असा तिघाडी सरकारचा प्लान आहे आणि यासाठी अत्यंत प्रामाणिकपणे संविधानाच्या चौकटीत राहून आपलं कर्तव्य बजावणार्या महाराष्ट्राच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांचा बळी जाण्याची शक्यता आहे यासाठी त्यांच्यावर काही तरी मोठं बालंटही आणलं जाण्याचीही शक्यता आहे.



आज जर वेगवेगळ्या डिपार्टमेंटचा पैसा एकट्या लाडक्या बहीण या योजनेत वळवला तर राज्याच्या विकासाचं धोरणच कोलमडु शकतं राज्याच्या विकासाच्या बाबतीत सगळ्यात जास्त बजेट सामाजिक न्यायविभाग आदिवासी विभाग(मंत्रालयात या विभागांच्या दारांसमोरच जास्त गर्दी दिसते )इकडे असतं यामध्ये मनोधैर्य योजना अँट्रासिटी ची मदत या योजनेतील मदत गेल्या वर्षभरापासून तर पिडीतांना आणखी मिळाली नाहीच पण जर मंजूर असेल तर तीही वळवली जाणार आहे बार्टी मध्ये संशोधन करणारे हजारांवर विद्यार्थी आहेत त्यांच्या फेलोशिपवर गदा येणार आहे एकात्मिकचं बजेट वळवलं तर माता मुलं यांच्यांवर परिणाम होणार आहे आपल्याला माहीत नाहीत अशा कित्येक योजना सरकार या एका योजनेत मर्ज करत आहे या सगळ्या बाबींचा अभ्यास आणि त्याबाबतचे कर्तव्य सुजाता सौनिक यांना माहिती असल्याने त्यांनी मंत्रीमंडळातील मुख्य तिघांना स्पष्टपणे नकार कळवला आहे यामुळे जाणिवपूर्वक सुजाता सौनिक यांना त्रास दिला जात आहे अशी आतली माहिती आहे तरी आपण सर्वांनी सुजाता सौनिक या संवैधानिक कर्तव्य बजावणार्या महिला अधिकारी आहेत त्यासाठी त्यांच्या पाठीशी उभे राहुया सरकारने त्यांच्यावर दबाव टाकुन निचपणाचा कळस गाठु नये ही निषेधासहीत तिघाड्या सरकारला विनंती

**********
थर्शीीीीीीक्षरीरीर्रीपळज्ञ
सत्यभामा सौंदरमल

# कवठा येथील दयानंद विद्यालयात शिक्षकदिन उत्साहात

कवठा : प्रतिनिधी उमरगा तालुक्यातील कवठा येथील दयानंद विद्यालयात डॉ. राधाकृष्णन यांची जयंती आणि शिक्षकदिन गुरूवार दि. ५ सप्टेंबर रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष दयानंद शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष विजयकुमार सोनवणे हे होते तर प्रुमुख पाहुणे संस्थेचे अध्यक्ष भरतराव सोनवणे, सचिव मधुकर सोनवणे, कोषाध्यक्ष मलंग रामाशेट्टी, मुख्याध्यापक पिंताबर कांबळे व दयानंद विद्यालयाचे सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते.



सर्वप्रथम कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर प्रशाळेतील विद्यार्थ्यांनी सर्वच गुरूजनांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. विद्यालयाचे मुख्याध्यापक कांबळे यांनी राधाकृष्णन यांच्याप्रमाणे अभ्यास करावा असा संदेश दिला. अध्यक्षीय समारोपात विजयकुमार सोनवणे यांनी आईवडील आपले पहिले गुरू असतात त्यांचे प्रथम दर्शन घ्यावे तसेच गुरूजनांबद्दल आदर बाळगावा असे मार्गदर्शन केले. आभार विद्यार्थी समर्थ भोसले याने मानले.

# गेल्या १२ वर्षांपासून रोज फक्त ३० मिनिटे झोपतो 'हा' जपानी माणूस! शरीरावर काय होतो परिणाम? तज्ज्ञांचा खुलासा.

कल्पना करा की, तुम्ही १० वर्षांपासून फक्त ३० मिनिटे झोपत आहात आणि तरीही सर्व कामे व्यवस्थितपणे करीत आहात. ही कल्पनाच किती आश्चर्यकारक आहे, हो ना. पण जपानमधील ह्योगो येथील ४० वर्षीय जपानी व्यावसायिक डायसुके होरी यांनी असा दावा केला आहे, गेल्या १० वर्षांपासून रोज फक्त ३० मिनिटे झोपत आहे.'साऊथ चायना मॉर्निंग पोस्ट'ला दिलेल्या माहितीनुसार होरी यांनी सांगितले, कमी वेळ झोपण्याची ही दिनचर्या ही दीर्घायुष्य मिळविण्याची एक पद्धत आहे.चांगल्या आरोग्यासाठी प्रौढ व्यक्तीला ६–८ तासांची झोप मिळणे आवश्यक आहे, याबाबत बहुतांश लोकांची सहमती आहे; पण होरी यांचे मत मात्र वेगळे आहे. होरी ठामपणे सांगतात, कमी झोपण्यामुळे काम करण्याची कार्यक्षमता आणि एकंदर लक्ष केंद्रित करण्यास मदत होते.जागे राहण्यासाठी होरी आपल्या दिनचर्येत नेहमीपेक्षा वेगळ्या गोष्टींचा समावेश करतात. त्यांनी सांगितले, जोपर्यंत जेवणाच्या एक तास आधी तुम्ही खेळ खेळता किंवा कॉफी पिता तोपर्यंत तुम्हाला झोप येणार नाही.अनेक लोक होरी यांचा दावा ऐकून थक्क झाले. होरी यांची दिनचर्या जाणून घेण्यासाठी एका जपानी टीव्ही शोने तीन दिवस त्यांच्याबरोबर घालवले. या शोदरम्यान होरी फक्त २६ मिनिटांसाठी झोपल्याचे आढळले; पण उठल्यानंतर त्यांना खूप ऊर्जा मिळाली असल्याचे जाणवले. त्यानंतर त्यांनी नाश्ता केला आणि ते काम करण्यासाठी गेले. तसेच ते जिममध्येही गेले.जपान शॉर्ट स्लीपर ट्रेनिंग असोसिएशनमार्फत कमी वेळ झोपण्याबाबत मार्गदर्शन देण्यात येते. त्यांच्याकडून पारंपरिक झोपण्याच्या पद्धतींना आव्हान देण्यात आहे.



पण, याबाबत अनेक प्रश्न लोकांच्या मनात निर्माण होत आहेत. त्यामुळे याबाबत तज्ज्ञ काय म्हणतात ते जाणून घेऊ या याबाबत दी इंडियन एक्स्प्रेसला माहिती देताना, जनरल फिजिशियन, एमडी, एमबीबीएस डॉ. पलेती शिव कार्तिक रेड्डी यांनी सांगितले, दररोज फक्त ३० मिनिटे झोपल्यामुळे दीर्घकाळापर्यंत आरोग्यावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. मेंदूचे कार्य, स्मृती एकत्रीकरण, रोगप्रतिकार शक्तीचे कार्य व चयापचय व्यवस्थापन यांसह विविध शारीरिक प्रक्रियांसाठी झोप आवश्यक आहे. रोज फक्त ३० मिनिटे झोपल्यामुळे अनेक आरोग्य समस्या उद्भवू शकतात.रोज फक्त ३० मिनिटे झोपल्याने कोणत्या आरोग्य समस्या निर्माण होतात? डॉ. रेड्डी सांगतात, दीर्घकाळापर्यंत कमी वेळ झोपण्यामुळे दृष्टिदोषासंबंधित संज्ञानात्मक कार्यावर लगेच परिणाम होतो. कमी वेळ झोपल्याने लक्ष केंद्रित होत नाही, सतर्कता कमी होते आणि समस्या सोडविण्याची व निर्णय घेण्याची क्षमता कमी होते. कमी वेळ झोपल्यामुळे कालांतराने स्मृतिभ्रंश यांसारखे आजार होण्याचा धोका असतो. झोपेत असताना शरीरात सायटोकिन्स या प्रथिनाचे उत्पादन होते; त्यामुळे संसर्ग, दाहकता किंवा तणाव यांचा सामना करण्यास मदत मिळते. कमी वेळ झोपल्याने सायटोकिन्सचे उत्पादन कमी होते आणि शरीर आजारांबाबत अधिक संवेदनशील होते.डॉ. रेड्डी असेही नमूद करतात, दीर्घकाळ झोपेच्या कमतरतेमुळे हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधित समस्या, हार्मोनल असंतुलन आणि चिंता व नैराश्य यांसारख्या मूड विकारांशी संबंधित त्रासांना सामोरे जावे लागते. दिवसातून फक्त ३० मिनिटे झोपल्याने माझे उत्पादन क्षमता वाढविणारे आयुष्य 'दुप्पट' झाले आहे, असा दावा होरी यांनी केला असला तरी आरोग्यावर होणारे नकारात्मक परिणाम हे कोणत्याही फायद्यांपेक्षा जास्त आहेत.अत्यंत कमी झोप वेळ झोपल्याने उत्पादकता वाढू शकते ही कल्पना भ्रामक आहे. कारण– उत्पादकतादेखील संज्ञानात्मक तीक्ष्णता, भावनिक स्थिरता आणि एकूण आरोग्यावर अवलंबून असते, असे ते पुढे म्हणतात.मानवी शरीर आणि मेंदूला इतक्या कमी झोपेशी जुळवून घेणे वैज्ञानिकदृष्ट्या शक्य आहे का? डॉ. रेड्डी सांगतात, वैज्ञानिकदृष्ट्या मानवी शरीर आणि मेंदू यांची रचना दिवसातील ३० मिनिटे इतक्या कमी झोपेशी जुळवून घेण्याच्या दृष्टीने तयार झालेली नाही.शरीराला पुन्हा ऊर्जा मिळविण्यासाठी संज्ञानात्मक प्रक्रिया आणि भावनिक नियमन यांसह विविध शारीरिक कार्यांसाठी झोप आवश्यक आहे. आपल्याला पुरेशी झोप मिळाली, तर आपण पुन्हा नव्याने ताजेतवाने होऊ शकतो. परंतु, कमीत कमी झोप घेणे आणि डोळ्यांची जलद हालचाल यांसारख्या त्रासदायक ठरू शकणाऱ्या झोपेच्या टप्प्यांमुळे ही प्रक्रिया रोखली जाते; जी आपल्याला आरोग्यदायी जीवनासाठी खूप आवश्यक असते.कमी झोपेच्या सवयीचे रूपांतर पुढे 'मायक्रो स्लीप' (काही सेकंदांची झोप) घेण्यामध्ये होऊ शकते. पण, त्यामुळे तुमची विचार करण्याची क्षमता, लक्ष केंद्रित करणे, निर्णय घेण्याची क्षमता किंवा प्रतिक्रिया देणे यांसारख्या दैनंदिन आवश्यक बाबी करणे अवघड होऊ शकते; एकंदरीत रात्री घेतल्या जाणाऱ्या झोपेला 'मायक्रो स्लीप' हा काही योग्य पर्याय नाही.रोज फक्त ३० मिनिटे झोपण्यामुळे शरीराचे झोपेचे वेळापत्रक बिघडते आणि त्यामुळे आरोग्याचे गंभीर नुकसान होऊ शकते. एकंदरीत ही बाब हे स्पष्ट करते की, दीर्घकाळपर्यंत कमी वेळ झोपण्याचा शरीरावर परिणाम होऊ शकतो. तुम्ही कितीही कमी झोप घेऊन काम करण्याचा प्रयत्न करा; पण तुम्ही पुरेशी झोप न घेतल्यास, त्याचा तुमच्या शरीरावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो.होरींसारखे अत्यंत कमी वेळ झोपल्यास शरीराच्या क्षमतेवर कसा परिणाम होतो?

# महाराष्ट्रात कर्करोगबाधित रुग्णांची नोंदणी बंधनकारक कधी करणार?

भारतामध्ये महाराष्ट्रात कर्करोगबाधित रुग्ण आणि मृत्यूचे प्रमाण उत्तरप्रदेशनंतर सर्वाधिक आहे. तसेच कर्करोगबाधित रुग्णांच्या आत्महत्यादेखील महाराष्ट्रात सर्वाधिक होत असल्याचे आढळले आहे. मात्र अद्यापही राज्यामध्ये कर्करोगांच्या रुग्णांची नोंदणी बंधनकारक करण्यास राज्य सरकारने ठोस पावले उचलेली नाहीत. परिणामी महाराष्ट्रातील कर्करोगाची स्थिती, प्रमाण, प्रसार आणि व्याप्ती याबाबत पुरेशी माहिती समोर आलेली नाही. नॅशनल कॅन्सर रजिस्ट्री कार्यक्रम (एनसीआरपी) देशभरात कर्करोगाचे प्रमाण हे राष्ट्रीय कर्करोग नोंदणी (नॅशनल कॅन्सर रजिस्ट्री) कार्यक्रमानुसार मोजले जाते. आयसीएमआरच्या बंगळुरूस्थित नॅशनल सेंटर फॉर डिसीज इन्फॉर्मेटिक्स अ‍ॅण्ड रिसर्च संस्थेमार्फत हा कार्यक्रम दोन पातळ्यांवर चालवला जातो. लोकसंख्या आधारित कर्करोग नोंदणी मध्ये विशिष्ट भौगोलिक क्षेत्रातील निश्चित लोकसंख्येमध्ये आढळणाऱ्या कर्करोगबाधित नवीन रुग्णांची नोंद केली जाते. तर रुग्णालय आधारित कर्करोग नोंदणी मध्ये विशिष्ट रुग्णालयात उपचार घेत असलेल्या कर्करोग रुग्णांची माहिती नोंदवली जाते, ज्यामध्ये प्रामुख्याने वैद्यकीय सेवा, उपचार आणि परिणामावर लक्ष केंद्रित केले जाते. १९८२ मध्ये ही नोंदणी सुरू झाली असून सुरुवातीला बंगळुरू, चेन्नई आणि मुंबई येथे लोकसंख्या आधारित तर चंदीगढ, तिरुवनंतपुरम आणि आसाममधील दिब्रुगढ येथे रुग्णालय आधारित नोंदणी केली जात होती. या कार्यक्रमाचा कालांतराने विस्तार होत सध्या लोकसंख्याआधारित नोंदणीमध्ये देशभरातील ३८ ठिकाणाहून रुग्णांची नोंदणी केली जाते. रुग्णालय आधारित नोंदणीमध्ये देशभरातील २७३ रुग्णालये जोडलेली आहेत. एनसीआरपी स्थापन करण्यामागील मुख्य उद्देश म्हणजे कर्करोगाची व्याप्ती समजून घेण्यासाठी कर्करोगबाधित रुग्ण आणि मृत्यूची आकडेवारी, कर्करोगाच्या विविध प्रकारांचे प्रमाण आणि त्यांची स्थिती, या प्रकारांचा भौगोलिकदृष्ट्या आणि आजाराच्यादृष्टीने झालेला प्रसार याची शास्त्रोक्त पद्धतीने माहिती संकलित करणे. या माहितीचा उपयोग कर्करोग नियंत्रणासाठीच्या धोरणांची दिशा ठरविण्याकरिता केला जातो. तसेच या धोरणांची आणि उपचारात्मक कार्यक्रमांच्या अंमलबजावणीचे मूल्यांकन करण्यासाठीदेखील ही माहिती उपयुक्त ठरते. सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेमध्ये कर्करोगाचे व्यवस्थापन सुधारण्यात आणि रुग्णसेवेचा दर्जा उंचावण्यात एनसीआरपीद्वारे प्राप्त माहितीचा सहभाग महत्त्वाचा आहे. तसेच या माहितीच्या आधारे अनेक संशोधनात्मक अभ्यासही केले गेले आहेत.२०२५ पर्यत कर्करोगाच्या प्रमाणात मोठ्या संख्येने वाढ होण्याचा अंदाजएनसीआरपीच्या २०२० च्या अहवालामध्ये २०१२ ते २०१६ काळात नोंद झालेल्या देशातील कर्करोगाच्या आजाराची स्थिती जाहीर करण्यात आली. या अहवालानुसार, २०२० मध्ये कॅन्सरचे प्रमाण १.३९ दशलक्ष असून २०२५ पर्यत ते १.५७ दशलक्षापर्यंत वाढण्याची शक्यता आहे. याच अहवालानुसार, महाराष्ट्रात २०२० मध्ये १ लाख १६ हजार १२१ रुग्णांची नव्याने नोंद झाली होती. २०२५ पर्यंत हे प्रमाण वाढून वर्षाला १ लाख ३० हजार ४६५ नव्या रुग्णांची नोंद होईल असा अंदाज या अहवालात व्यक्त केला आहे.

एनसीआरपीच्या मर्यादा भारतामध्ये कर्करोग हा अधिसूचनीय आजार म्हणजेच याची नोंदणी करणे बंधनकारक नाही. त्यामुळे कर्करोगबाधित रुग्णांची माहिती संकलित करण्यामध्ये अनेक अडचणी येत असल्याचे एनसीआरपीच्या अहवालात नमूद केले आहे. एनसीआरपीमध्ये लोकसंख्याआधारित नोंदणीमध्ये देशभरातील १० टक्के लोकसंख्येचा समावेश आहे. दक्षिण भारत आणि ईशान्येकडील राज्यांमध्ये जास्त केंद्रे आहेत. तर राजस्थान, ओरिसा, छत्तीसगढ, झारखंड आणि हिमाचल प्रदेशमध्ये एकाही केंद्राचा समावेश नाही. त्यामुळे ही नोंदणी संपूर्ण देशाचे प्रतिनिधित्व करत नाही. यामागील महत्त्वाचे कारण म्हणजे रुग्णालये, प्रयोगशाळांमार्फत एनसीआरपीला माहिती उपलब्ध न होणे. महाराष्ट्रात लोकसंख्याआधारित नोंदणीमध्ये मुंबई, पुणे, वर्धा जिल्हा, नागपूर शहर, नागपूर ग्रामीण, बार्शी ग्रामीण, औरंगाबाद शहर, उस्मानाबाद आणि बीड जिल्हा अशा नऊ ठिकाणांचा समावेश आहे. मुंबई, पुणे आणि नागपूरमध्ये १०० टक्के शहरी भागांचा समावेश आहे. वर्धा जिल्ह्यात ३३ टक्के शहरी तर ७७ टक्के ग्रामीण भागात, तर उस्मानाबाद आणि बीडमध्ये १९ टक्के शहरी आणि ८१ टक्के ग्रामीण भागात ही नोंदणी केली जाते. बार्शी आणि नागपूर ग्रामीण या दोन ठिकाणीच १०० टक्के ग्रामीण भागाचा समावेश यामध्ये आहे. रुग्णालय आधारित नोंदणीमध्ये, राज्यातील २० रुग्णालये त्यांच्याकडे उपचारांसाठी दाखल झालेल्या रुग्णांची नोंदणी करतात. यामध्ये प्रामुख्याने मुंबई, पुणे, नागपूर येथील रुग्णालयांचा समावेश असून यामध्ये केवळ तीन सरकारी रुग्णालयांचा समावेश आहे, अन्य सर्व रुग्णालये खासगी किंवा धर्मादाय रुग्णालये आहेत.अधिसूचनीय आजाराची मान्यता देण्याची समितीची शिफारसएनसीआरपी १९८२ पासून भारतामध्ये कार्यरत असूनही लोकसंख्या आधारित नोंदणीमध्ये देशातील १० टक्के लोकसंख्येपर्यंतच पोहोचली असून यातही ग्रामीणमधील केवळ १ टक्के लोकसंख्येचा समावेश असल्याचे केंद्रीय आरोग्य विभागाच्या संसदीय समितीने डिसेंबर २०२२ साली राज्यसभा आणि लोकसभेमध्ये सादर केलेल्या देशातील कॅन्सर स्थितीच्या अहवालामध्ये म्हटले आहे. यामागील प्रमुख कारण म्हणजे रुग्णालये, प्रयोगशाळा आणि तपासणी केंद्रांमार्फत एनसीआरपीला माहिती उपलब्ध न होणे. भारतासारख्या विविधता असलेल्या देशामध्ये कर्करोगाच्या सेवा आणि नियंत्रणासाठी या आजाराची व्याप्ती सखोलपणे समजणे गरजेचे आहे आणि यासाठी कर्करोगासंबधीची माहिती संकलित करणारी यंत्रणा आणि याची माहिती देण्याची जबाबदारी संबंधित घटकांवर सोपवणे गरजेचे आहे. यासाठी कर्करोगाला अधिसूचित आजाराची मान्यता देण्याची आवश्यकता असल्याचे ठाम मत समितीने व्यक्त केले आहे. अधिसूचनीय आजार नसल्याने कर्करोगबाधित रुग्णांच्या मृत्यूची नोंदही योग्यरितीने केली जात नाही. बहुतांश वेळा रुग्णाचा मृत्यू हृदयाची श्वसनक्रिया बंद पडल्याने झाला असे नमूद केलेले असते. परंतु यामध्ये मृत्यूचे प्रमुख कारण लिहिले जात नाही, असंही समितीने निर्दशनास आणले आहे. कर्करोगाला अधिसूचनीय आजाराचा दर्जा दिल्यास कर्करोगाच्या मृत्यूची नोंद करणे बंधनकारक होईल, असेही समितीने स्पष्ट केले आहे. यामुळे कर्करोगाची आकडेवारी आणि आजाराच्या प्रमाणाची अचूक माहिती समोर येईल. याचा फायदा जोखमीच्या घटकांचे विश्लेषण, कर्करोग निदान कार्यक्रमाची अंमलबजावणी आणि कर्करोग उपचार सेवेसाठी आवश्यक संसाधनांचे वितरण करण्यासाठी निश्चितच होईल. कर्करोगाच्या आजाराची माहिती योग्यरितीने अपडेट राहण्यासाठी रुग्णांची नोंदणी करण्यासाठी कोविन सारख्या पोर्टलची निर्मिती करण्याची शिफारसही समितीने केली आहे. कर्करोगाची नोंदणी वाढविण्यासाठी आयुष्मान भारत, मृत्यूची नोंदणी, रुग्णालय माहिती यंत्रणा इत्यादी यंत्रणांसोबत कर्करोग नोंदणी कार्यक्रमासोबत जोडण्याची शिफारसही समितीने केली आहे.राज्यात ग्रामीण भागातील कर्करोगाचे चित्र अस्पष्ट महाराष्ट्रामध्ये इतर राज्यांच्या तुलनेत लोकसंख्याआधारित नोंदणीची ठिकाणे जास्त आहेत. परंतु ही नोंदणी शहर केंद्रित जास्त आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील रुग्णांची नोंद यामध्ये फार कमी प्रमाणात केली जाते. ग्रामीण भागामध्ये अजूनही अनेक रुग्ण आरोग्य व्यवस्थेपर्यंतच पोहोचू शकलेले नाहीत असे आढळले आहे.



त्यामुळे ग्रामीण भागातील कर्करोगाच्या स्थितीचे चित्र अस्पष्टच आहे. २०१७–१८ मध्ये सिंधुदुर्गमध्ये झालेल्या लोकसंख्याआधारित नोंदणीमध्ये मोठ्या प्रमाणात कर्करोगाच्या रुग्णांची माहितीच उपलब्ध नसल्याचे अहवालात मांडले आहे. अनेक खासगी आणि सरकारी रुग्णालयांनी माहिती देण्यास नकार, सरकारी रुग्णालयामध्ये वैद्यकीय माहिती योग्यरीतीने जतन न होणे, मृत्यूची पुरेशी माहिती उपलब्ध नसणे यामुळे रुग्णांची योग्य माहिती मिळत नसल्याचे या नोंदणीमध्ये दिसून आले. कर्करोगाचे निदान आणि उपचार जिल्हा रुग्णालयात उपलब्ध नसल्याने रुग्ण यासाठी दुसऱ्या जिल्ह्यांमध्ये गेल्याचे आढळले. यामुळे देखील रुग्णांची योग्य नोंदणी करण्यात अडचणी येत असल्याचे दिसून आले.गडचिरोलीमध्ये २०१५ ते २०१८ काळात केलेल्या लोकसंख्या आधारित नोंदणीमध्ये रुग्णांकडे त्यांच्या आजाराच्या निदानाबाबत काहीच माहिती उपलब्ध नसणे, जिल्ह्याच्या ठिकाणी निदानाच्या सोयींची अनुपलब्धता, रुग्णाच्या माहितीचे योग्यरितीने जतन न करणे यामुळे अनेक अडचणी आल्याचे मांडले आहे. केवळ १५ टक्के रुग्णांची मायक्रोस्कोपद्वारे कर्करोगाचे निदान करण्यात आले होते. त्यामुळे जवळपास ५७ टक्के नोंदणी ही रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांशी संवाद साधून त्यातून मिळालेल्या माहितीमधून करावी लागल्याचे या अहवालात मांडले आहे. जिल्ह्यामध्ये अनौपचारिक औषधोपचारांचा अवलंब मोठ्या प्रमाणात करत असल्याचेही आढळले. या जिल्ह्यामध्ये रुग्णांची नोंदणीचे प्रमाण अत्यल्प असण्यापेक्षा रुग्णांचे निदानच अत्यल्प प्रमाणात होत असल्याचे प्रामुख्याने आढळले असे अहवालात अधोरेखित केले आहे.टाटा मेमोरियल सेंटरच्या सेंटर फॉर कॅन्सर एपिडेमिओलॉजीचे संचालक डॉ. राजेश दीक्षित सांगतात, गेल्या काही वर्षांमध्ये लोकसंख्या आधारित नोंदणीची ठिकाणी वाढली आहेत. परंतु महाराष्ट्रात मुंबई, पुणे, नागपूर अशा मोजक्याच ठिकाणी ही नोंदणी केली जाते. त्यामुळे उर्वरित महाराष्ट्रातील कर्करोगबाधितांची माहिती उपलब्ध नाही. विशेषत: ग्रामीणमध्ये केवळ बार्शी आणि आता नागपूरमधील ग्रामीण भागाचा यात समावेश आहे. तेव्हा महाराष्ट्रामधील कर्करोगाच्या स्थितीची योग्य माहिती प्राप्त होण्यासाठी रुग्णांच्या नोंदी जास्तीत जास्त प्रमाणात होणे गरजेचे आहे.

## झोपेचं रुटीन बिघडलंय! फक्त एक तासाची कमी झोप तुमच्या आरोग्यासाठी ठरेल धोक्याची घंटा? तज्ज्ञांनी केला खुलासा

झोप हा काहींच्या जिव्हाळ्याचा विषय असला तरी त्यात अनेकांच्या झोपेचं रुटीन कधीही सेट नसतं. अतिरिक्त कामामुळे म्हणा किंवा दुसऱ्या कोणत्याही कारणामुळे आठवड्यात झोपेची वेळ विस्कटली की पुढचा पूर्ण दिवस बिघडल्यासारखाच होतो. त्यात विकेंडला काही लोक आठवड्यातील झोप भरून काढण्यासाठी जास्त वेळ झोपतात. परंतु, अशा स्लीप रुटीनमुळे आपल्या शरीरावर याचे गंभीर परिणाम होऊ शकतात, तसेच आठवड्याभरात अपुरी राहिलेली झोप विकेंडला घेतल्याने त्याचे काही फायदे आहेत का, हे आपण आज या लेखातून जाणून घेणार आहोत.युरोपियन सोसायटी ऑफ कार्डिओलॉजीच्या अलीकडील अभ्यासात असे सुचवले आहे की, विकेंडच्या झोपेमुळे हृदयविकाराचा धोका २० टक्क्यांपर्यंत कमी होऊ शकतो. कामामुळे संपूर्ण आठवड्यामध्ये पुरेशी झोप न मिळणाऱ्यांसाठी हा शोध आशादायी आहे.डॉक्टर सुधीर कुमार, अपोलो हॉस्पिटल्स हैदराबादचे न्यूरोलॉजिस्ट, यांनी एक्सवरील (पूर्वीचे ट्विटर) एका पोस्टमध्ये असे नमूद केले की, तुम्ही दररोज जरी फक्त एक तासाची झोप कमी घेतली, तरी त्यातून बरे होण्यासाठी तुम्हाला चार दिवस लागू शकतात.या परस्परविरोधी दृष्टिकोनांमुळे, शनिवार व रविवारची झोप आठवड्यातील झोपेची कमी भरून काढू शकते की नाही, यावर अजूनही वादविवाद कायम आहे.विकेंडची झोप आणि हृदयविकाराचा धोका डॉ. चंद्रिल चुघ, गुड डीड क्लिनिकचे संचालक आणि वरिष्ठ सल्लागार न्यूरोलॉजिस्ट, यांनी.लेला याबद्दल सांगितले की, विकेंड स्लीप रिकव्हरी किंवा 'कॅच–अप स्लीप', दीर्घकाळ झोपेच्या अनियमितपणामुळे उद्भवलेले काही नकारात्मक परिणाम कमी करण्यात मदत करू शकते; जसे की, हृदयविकाराचा धोका. अर्थात, यात अधिक संशोधनाची आवश्यकता आहे.डॉ. जगदीश हिरेमठ, कार्डियाक इंटेन्सिव्हिस्ट, याबाबत सहमत आहेत. ते म्हणाले की, विकेंड स्लीप रिकव्हरी आठवडाभरातील अपूर्ण राहिलेल्या झोपेच्या नकारात्मक प्रभावातून निर्माण झालेला हृदयविकाराचा धोका कमी करू शकते.कॅचिंग अप ऑफ स्लीपमुळे म्हणजेच विकेंडला पुरेशी झोप घेतल्याने शरीरातील सी–रिक्टिव्ह प्रोटीन सारखे मार्कर कमी होऊन जळजळ कमी होऊ शकते, जे हृदयरोगाशी निगडीत आहेत. तसेच कॅच अप स्लीप रक्तदाब नियंत्रित करण्यास मदत करते, ज्यामुळे उच्च रक्तदाबाचा धोका कमी होतो. तसंच ते कॉर्टिसॉलसारख्या स्ट्रेस हॉर्मोन्स नॉर्मल करण्यास मदत करतात.याव्यतिरिक्त, स्लीप रिकव्हरी इन्सुलिन संवेदनशीलता आणि चयापचय कार्य सुधारू शकते, तसेच हृदयाच्या आरोग्यास प्रोत्साहन देते. पुरेशी झोप स्वायत्त मज्जासंस्थेतील संतुलन पुनर्संचयित करते, जे हॉर्ट रेट आणि ब्लड प्रेशर कंट्रोल करते आणि एथेरोस्क्लेरोसिसचा धोका कमी करून एंडोथेलियलचे कार्य वाढवते. रिकव्हरी स्लीप हृदयाची विद्युत प्रणाली स्थिर करू शकते, रिथमियाचा धोका कमी करते.विकेंडच्या झोपेने हृदयविकाराचा धोका कमी होऊ शकतो, या कल्पनेशी डॉ. कुमार यांचे विधान जुळते का?आधी सांगितल्याप्रमाणे, डॉ. चंद्रिल चुघ यांनी सांगितले की, संशोधन असे सूचित करते की, आठवड्याभरात अपुरी राहिलेली झोप विकेंडच्या वेळी भरून काढली तरी ती केवळ थोड्या प्रमाणातच आपल्याला रिकव्हर करते.

# महायुतीचे सरकार पुन्हा येणार, लाडक्या बहिणी आनंदी होणार भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या संवाद दौऱ्यात महिलांनी व्यक्त केली भावना

लातूर :- लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील गावागावात वाडी वस्तीत जाऊन जनतेशी हितगुज करण्यासाठी आणि अडीअडचणी समजून घेण्यासाठी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी सुरू केलेल्या जनसंवाद दौऱ्याला सर्वत्र मोठा प्रतिसाद मिळत आहे. नरेंद्र मोदी देशाचे पंतप्रधान झाले, त्यांनी गोरगरिबांचा विचार केला, राज्यात पुन्हा महायुतीचे सरकार येणार, लाडक्या बहिणी पुन्हा आनंदी होणार, असा पाळणा एका महिलेने गाऊन उपस्थितांची मने जिंकली. शेतकऱ्यांची पिळवणूक आणि अडवणूक करणाऱ्या मांजरा परिवाराच्या नेतृत्वाने पाचट कपातीचे पैसे द्यायचेच होते तर ऊसाच्या वजनातून कपातच का केली असा प्रश्न उपस्थित करून कपातीचे पैसे देताय म्हणजे उपकार करत नाहीत. शेतकऱ्यांच्या कष्टाचा, घामाचा दाम आहे असे भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी बोलून दाखविले.





गावा गावात जाऊन ग्रामस्थांशी संवाद साधण्यासाठी सुरू केलेल्या संवाद दौऱ्यात शुक्रवारी रेणापूर तालुक्यातील मौजे सेलू नवीन वस्ती, जवळगा आणि हारवाडी येथे ग्रामस्थांचा मोठा प्रतिसाद मिळाला. आ. रमेशआप्पा कराड यांचे आगमन होताच विविध वाजंत्री वाजवून फटाक्यांची आतिषबाजी करत जेसीबीतून फुले उधळून मोठ्या उत्साहाच्या आणि जल्लोषाच्या वातावरणात स्वागत करण्यात आले. यावेळी महिलांची लक्षणीय उपस्थिती होती. यावेळी आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते सेलू येथे आमदार स्थानिक विकास निधीतील सभागृहासह विविध विकास कामाचा, जवळगा येथे १ कोटी ९९ लक्ष रुपये खर्चाच्या विविध विकास कामाचा आणि हारवाडी ५१ लक्ष रुपये खर्चाच्या विविध विकास कामाचे लोकार्पण आणि शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, जिल्हा सरचिटणीस महेंद्र गोडभरले, पंचायत राज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, विधानसभा अध्यक्ष अनिल भिसे, तालुकाध्यक्ष दशरथ सरवदे, संगायो समिती अध्यक्ष वसंत करमुडे, जिल्हा उपाध्यक्ष सतीश आंबेकर, अमर चव्हाण, मोहन राऊतराव, रमाकांत फुलारी, श्रीकृष्ण पवार, बालाजी मानमोडे, प्रल्हाद फुलारी, शालीक गोडभरले, राजू कांबळे, जयप्रकाश जटाळ, राजकुमार मानमोडे, शेख जलील, शिला आचार्य, विजय चव्हाण, उत्तम चव्हाण यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

गेल्या ७० वर्षात काँग्रेसच्या काळात विकासाची किती कामे झाली केंद्र शासनाच्या कुठल्या योजना मिळाल्या असा प्रश्न उपस्थित करून गेल्या दहा वर्षात नरेंद्रजी मोदी साहेब आणि राज्यातील महायुती शासनाने गोरगरीब सर्वसामान्य माणसाला केंद्रबिंदू मानून अनेक कल्याणकारी योजना सुरू केल्या असल्याची माहिती देऊन ग्रामस्थांशी संवाद साधताना आ. रमेशआप्पा कराड यांनी शासनाने समाजातील सर्व घटकासाठी सुरू केलेल्या विविध योजनांची माहिती दिली. वैयक्तिक लाभाच्या योजना कोणाकोणाला मिळाल्या असा प्रश्न विचारला असता अनेकांनी मिळालेल्या योजनेबद्दल समाधान व्यक्त करून गावातील अडीअडचणी मांडल्या. ग्रामस्थांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना आ. कराड यांच्याकडून समाधानकारक उत्तरे मिळाल्याने उपस्थितातून समाधान व्यक्त केले जात होते. शासनाने महिलांच्या आणि शेतकऱ्यांच्या हिताचे अनेक निर्णय घेतले शेतकऱ्यांचे विज बिल माफ केले. पुढील पाच वर्ष वीज पुरवठा मोफत मिळणार आहे. लाडकी बहीण सुरू केली. महिलांना प्रवासात सवलत दिली. एक रुपयात पिक विमा. मागेल त्याला गाय गोठे आणि विहिरी देण्यात आल्या. मोफत राशन, पात्र लाभार्थ्यांना घरकुले, यासह असंख्य योजनांचा राज्य गोरगरीब जनतेला लाभ मिळत आहे. या सर्व योजना पुढील काळातही चालू ठेवण्यासाठी विधानसभा निवडणुकीत महायुतीला साथ द्यावी लाडक्या बहिणींनी मदत करणाऱ्या भावाला आशीर्वाद द्यावा असे आव्हान आ. रमेशअप्पा कराड यांनी केले.

संवाद कार्यक्रमात ठिकठीकाणी ग्रामस्थांनी राशन दुकानदार अन्नधान्य वाटप करत नाही, निराधारच्या पगारी वेळेवर होत नाहीत, गावात अवैद्य दारूचे विक्री वाढली आहे, लाडक्या बहिणीचे अजून पैसे मिळाले नाहीत, सभागृह करावे, पिण्याचे पाणी नियमित मिळत नाही, रस्त्याचा प्रश्न बिकट झाला आहे, शिवरस्ते पांदण रस्ते करावे असे अनेक प्रश्न उपस्थित केले असता भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, गेल्या पंधरा वर्षापासून या मतदारसंघात निवडून आलेले काँग्रेसच्या आमदारांनी केले काय? जनतेने जाब विचारला पाहीजे, आताच्या आमदाराचे घरदार मुंबईत आहे चार दिवसाला पर्यटनासारखे मतदारसंघात येऊन जातात यांना सामान्य जनतेच्या प्रश्नाशी काहीही घेणं देणं नाही. नरेंद्रजी मोदी यांनी जनतेला शुध्द पिण्याचे पाणी मिळावे यासाठी जलजीवन योजनेअंतर्गत हर घर नल से जल ही योजना गावोगाव सुरु केली. निराधारांना शासन न्याय देण्याचा प्रयत्न करीत आहे मात्र जिल्हा बँक काँग्रेसवाल्याच्या ताब्यात असल्याने जाणीवपूर्वक आडवणूक केली जात आहे. संवाद कार्यक्रमातून पोलीस अधिकाऱ्याला फोन लावून अवैध दारू विक्री तात्काळ बंद करण्याची आणि पुरवठा अधिकाऱ्यांना गोरगरीब जनतेला धान्य वाटप करीत नसलेल्या दुकानदारावर तातडीने कारवाई करण्याच्या सूचना देवून आ. रमेशअप्पा कराड यांनी लाडकी बहीण योजनेअंतर्गत एकही पात्र महिला वंचित राहणार नाही, ज्यांना पैसे मिळाले नाहीत अशा लाभार्थ्यांच्या खात्यावर तीन महिन्याचे साडेचार हजार रुपये येत्या काही दिवसात मिळतील असे बोलून दाखविले.

मांजरा परिवाराच्या माध्यमातून शेतकऱ्याची आडवणूक आणि पिळवणूक मोठ्या प्रमाणात होत असताना शेतकऱ्यांनी जागरूक असले पाहिजे. शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी मांजराच्या दारात पहिल्यांदा मी आंदोलन केले. एफआरपीप्रमाणे शेतकऱ्यांना ऊसाचे बिल देण्याचे बंधन मोदी सरकारने घातल्यापासून मांजरा परिवाराची रिकव्हरी का कमी येऊ लागली असा प्रश्न उपस्थित केला. शेतकरी तोच, ऊसही तोच आहे, जमीनही तीच आहे आणि पाणीही तेच आहे मग बदल झाला कशात. मशीनद्वारे ऊसाची तोडणी केलेल्या ऊसात पाचटाचे प्रमाण जास्त आहे असे दाखवून मांजरा परिवाराच्या नेतृत्वाने पाचट कपातीचे पैसे द्यायचेच होते तर उसाच्या वजनातून कपातच का केली असा प्रश्न उपस्थित करून कपातीचे पैसे देताय म्हणजे उपकार करत नाहीत शेतकऱ्यांच्या कष्टाचा, घामाचा दाम आहे असे भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी बोलून दाखविले.

आ. रमेशअप्पा कराड यांच्या संवाद कार्यक्रमास सेलू येथे नामदेव बोंबडे, सरपंच अर्चना बोंबडे, आबासाहेब चित्ते, गोविंद पनगुले, आबासाहेब भोसले, जर्नाधन सुर्यवंशी, विष्णु मलवाड, संतोष बोडके, उध्दव बोळंगे, अंगद कोंपले, हरीश्चंद्र सुरवसे, योगेश पनगुले, महादेव बोळंगे जवळगा येथे निवृत्ती कीटेकर, चंद्रकांत पाटील, रवींद्र पाटील, निवृत्ती चिद्रे, विजय पाटील, नारायण राठोड, बाळू कटके, संजय जाधव, मनोज पाटील, कृष्णात वाघे, ज्योतीराम कांबळे, संजय जाधव, बाबू साठे, चंद्रकांत नैने, विक्रम कांबळे, महादेव नायने, अशोक बनसोडे, रणजीत पाटील, गणपत जाधव, मंगेश जाधव, हारवाडी येथील संवाद कार्यक्रमास उपसरपंच चंद्रकांत माने आणि दिलीप हाके, बालासाहेब चोथवे, नानासाहेब माने, अशोक गगथडे, राजाभाऊ इंगळे, यशवंत इंगळे, दिलीप चोथवे, विष्णू शिवनकर, बंकट कातपुरे, शिवाजी भंडे, मारुती हाके, प्रल्हाद माने, धनंजय भंडे यांच्यासह गावातील महिला पुरुष तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते. हारवाडी ग्रामस्थांच्या वतीने संगीता कातपुरे कीर्ती अवस्थी, किरण माने, निर्मला भंडे, जमुना भंडे या पाच महिलांच्या वतीने आ. रमेशआप्पा कराड यांचा यथोचित सत्कार करून स्वागत करण्यात आले.

# नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना सरसकट मदत द्या काँग्रेसची निवेदनातून मागणी; अतिवृष्टीचा पिकांना फटका हातातोंडाशी आलेला घास हिरावला

किनवट/शेख चौकात :-किनवट तालुक्यातील क्षेत्रातील सर्व मंडळात सरसकट ओला दुष्काळ जाहीर करून शेतकरी बांधवाना तात्काळ आर्थिक मदत देण्यात यावी या मागणीचे निवेदन किनवट तालुका व शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने सहाय्यक जिल्हाधिकारी यांना दि.०४ सप्टेंबर रोजी येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयात देण्यात आले. निवेदनात नमूद करण्यात आले की, किनवट तालुक्यातील सर्व मंडळात सप्टेंबर महिन्यात प्रचंड अतिवृष्टी झाली. त्यामुळे वादळीवार्यासह मुसळधार पावसाने नदी नाल्यांना महापुर आला. या पावसामुळे शेतकरी बांधवाच्या शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. जोरदार पावसामुळे शेतकर्यांचे सोयाबीन, कापूस, तूर, हळद, ज्वारी, मूंग, उडीद आदी पीकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. तसेच अतीपावसामुळे शेतकर्याच्या शेतातील सुपीक माती खरडून गेली. ज्यामुळे शेतकर्यांचे संसार उघड्यावर आले, त्यांचे उभे पीक वाहून गेल्याने शेतकर्यांच्या हाता तोंडाला आलेला घास हिरावला गेला. या आसमानी संकटामुळे शेतक-यांचे कधीही भरून न येणारे नुकसान झाले असल्याने शेतकरी हतबल झाला आहे. जिल्हा प्रशासनाने शेतकर्यांना सरसकट प्रति हेक्टरी ५० हजार रुपये तातडीची मदत द्यावी, अशी किनवट तालुका व शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने सहाय्यक जिल्हाधिकारी यांचे मार्फत जिल्हा प्रशासनाला विनंती केली आहे. सरसकट ओला दुष्काळ जाहीर करून पीक विमा कंपनीला तात्काळ आदेश शेतकर्यांना सरसकट पीक विमा देण्यात यावा अशी मागणी किनवट काँग्रेस कमिटीचे तालुकाध्यक्ष के. सूर्यकांत रेड्डी व शहर अध्यक्ष गिरीष नेम्मानीवार यांच्या नेतृत्वात निवेदन देण्यात आले. निवेदनाच्या प्रती महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, जिल्हाधिकारी नांदेड व तहसिल प्रशासनाला देण्यात आल्या आहेत. निवेदनावर काँग्रेस कमिटी तालुकाध्यक्ष के. सूर्यकांत रेड्डी, किनवट शहर काँग्रेस कमिटी अध्यक्ष गिरीष नेम्मानीवार, माजी नगराध्यक्ष के. मूर्ती, अभय महाजन, सिराज जिवाणी, जव्वाद आलम, शेख इमरान शेख चांद, वसंत राठोड, खालेद भाई, अनुप देशमुख, लक्ष्मीपती दोनपेल्लीवार, गनीभाई खुरेशी, अंबादास वरगुडे, रवि देशमुख, स. जायद भाई आदींच्या स्वाक्षर्या आहेत.



# स्वामी दयानंद विद्यालयात शिक्षक दिन उत्साहात साजरा

लातूर ०६-०९-२०२४ जेएसपीएम संचालित स्वामी दयानंद विद्यालय कव्हा या शाळेमध्ये डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला शाळेच्या मुख्याध्यापिका अरुणा कांदे यांच्याहस्ते पुष्पहार अर्पण करून शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी देशमुख, प्राथमिकच्या मुख्याध्यापिका सुनिता मुचाटे, कदम, धामणगावे, थंबा, मोकाशे, तुरेवाले, शिवाजी घार, अंबेसंगे, बिरंगल, राजाराम काळे, नवनाथ पांचाळ आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी इयत्ता १ ली ८ वी वर्गातील विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. तसेच इयत्ता १० पर्यंतच्या सर्व शिक्षक वृंदांनी शिक्षक दिनाविषयी महत्त्व विषद करून शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी शाळेतील गुणवंत विद्यार्थी व शिक्षकांनाही भेटवस्तू देऊन शिक्षक दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार दिपमाला मस्के यांनी केले. यावेळी या कार्यक्रमाला शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचार्यासह विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



# मनपाच्या फायरमन व यंत्रचालक पदासाठी शारीरिक पात्रता व मैदानी चाचणी बाभळगावच्या पोलीस मुख्यालय मैदानावर झाल्या चाचण्या आयुक्तांनी मानले पोलीस अधीक्षकांचे आभार

लातूर/प्रतिनिधी:लातूर शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागातील ३० फायरमन व ९ यंत्र चालक या पदांसाठी महिला व पुरुष उमेदवारांची शारीरिक पात्रता व मैदानी चाचणी पोलीस मुख्यालय, बाभळगाव रोड येथे घेण्यात आली.एकूण १४७ उमेदवारांनी यात सहभाग नोंदवला.या चाचण्यांसाठी पोलीस मुख्यालयाचे मैदान उपलब्ध करून दिल्याबद्दल मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांचे आभार मानले आहेत.

प्रारंभी उपस्थित उमेदवारांची शारिरीक पात्रता तपासणी करण्यात आली.त्यानंतर पुरुष उमेदवारांसाठी १६०० मीटर धावणे, शिडीवर ३३ फूट चढणे व उतरणे,५० किलो वजनाची मानवी प्रतिकृती घेऊन ६० मीटर धावणे, २० फूट दोरीवर चढणे व उतरणे,२० पुल-अप्स याचा समावेश होता. महिला उमेदवारांसाठी ८०० मीटर धावणे, शिडीवर ३३फूट चढणे व उतरणे,४०किलो वजनाची मानवी प्रतिकृती घेऊन ६० मीटर धावणे,गोळा फेक,लांब उडी,पुश-अप आदी मैदानी चाचण्या घेण्यात आल्या.

या चाचण्या घेण्यासाठी महानगरपालिकेस मैदान उपलब्ध करून दिल्या बद्दल आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांचे आभार मानले आहेत.

# क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांचा दौरा

लातूर :- राज्याच्या क्रीडा व युवक कल्याण, बंदरे विभागाचे मंत्री संजय बनसोडे हे शनिवार, ७ सप्टेंबर, २०२४ रोजी लातूर जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. क्रीडा व युवक कल्याण मंत्री ना. संजय बनसोडे यांचे ७ सप्टेंबर रोजी सकाळी ६-२५ वाजता लातूर रेल्वे स्टेशन येथे आगमन होईल. दुपारी १ वाजता लातूर येथून मोटारीने उदगीरकडे प्रयाण करतील. दुपारी २ वाजता उदगीर येथील शिवपार्वती मंगल कार्यालय येथे आयोजित श्री. अर्जूनराव लालू गोडबोले, मुख्याध्यापक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर शाळा यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा व कु. यश व कु. स्वंयम यांचा वाढदिवस सोहळ्यास उपस्थित राहतील. त्यानंतर उदगीर येथे राखीव. सायंकाळी ७-१५ वाजता युवक संघ गणेश मंडळ पारकट्टी गल्ली , २०२४ उदगीरच्यावतीने मानाचा पहिला आजोबा गणपती मूर्तीच्या प्राण प्रतिष्ठापना सोहळ्यास उपस्थिती. सायंकाळी ७-३० वाजता मुक्कावार चौक उदगीर येथील श्रीमंत व्यापारी गणेश मंडळ उदगीर सार्वजनिक गणेशोत्सव -२०२४ च्या श्रींची मूर्ती प्राणप्रतिष्ठापना सोहळ्यास उपस्थिती. रात्री ८ वाजता उदगीर तालुक्यातील हमालवाडी येथील रक्षाधीश गणेश मित्र मंडळ मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठापना सोहळ्यास व श्री च्या आरतीस उपस्थिती. रात्री ९ वाजता उदगीर शहरातील पत्तेवार चौक येथील संघर्ष मित्र मंडळ व श्री. नवयुवक व्यापारी गणेश मंडळ गणेशोत्सव -२०२४ च्या ममर्ती प्राणप्रतिष्ठापना सोहळ्यास व श्री च्या आरतीस उपस्थिती. सोईनुसार उदगीर येथून मोटारीने लातूरकडे प्रयाण .



# ‘मुख्यमंत्री योजनादूत’ उपक्रमासाठी अर्ज करण्याचे आवाहन

लातूर :- शासनाच्या विविध योजनांची सर्वसामान्य नागरिकांना माहिती देण्यासाठी मुख्यमंत्री योजनादूत उपक्रम सुरु करण्यात आला आहे. या उपक्रमात सहभागी होण्यासाठी उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. इच्छुक उमेदवारांनी या संकेतस्थळावर नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत मुख्यमंत्री योजनादूत उपक्रम राबविण्यात येत आहे. प्रत्येक ग्रामपंचायत पातळीवर एक तर शहरी भागात प्रत्येक पाच हजार लोकसंख्येमागे एक अशा पद्धतीने राज्यात एकूण ५० हजार योजनादूतांची सहा महिन्यांसाठी निवड केली जाणार आहे. या योजनादूतांना दरमहा १० हजार रूपये मानधन दिले जाणार आहे. हे योजनादूत शासनाच्या लोककल्याणकारी योजनांबाबत नागरिकांना माहिती देतील. या योजनेत सहभागी होण्यासाठी इच्छुक उमेदवार १८ ते ३५ वयोगटातील असावा, उमेदवार कोणत्याही शाखेचा पदवीधर असणे आवश्यक आहे, उमेदवाराकडे महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. उमेदवारास संगणक ज्ञान असावे. त्याच्याकडे अद्ययावत मोबाईल (स्मार्ट फोन) आणि आधारसंलग्न बँक खाते असणे आवश्यक आहे. मुख्यमंत्री योजनादूत उपक्रमासाठी केलेला ऑनलाईन अर्ज, आधार कार्ड, पदवी उत्तीर्ण असल्याबाबतची पुराव्यादाखल कागदपत्रे / प्रमाणपत्र इ., अधिवासाचा दाखला. (सक्षम यंत्रणेने दिलेला), उमेदवाराकडे आधार जोडणी असलेल्या बँक खात्याचा पुरावा, पासपोर्ट आकाराचा फोटो, हमीपत्र (ऑनलाईन अर्जासोबतच्या नमुन्यामधील) नियुक्तीवेळी सादर करणे आवश्यक आहे. १३ सप्टेंबर २०२४ पर्यंत इच्छुक उमेदवारांना या संकेतस्थळावर नोंदणी करता येईल.

# विनेश, बजरंग पुनियाची काँग्रेसमध्ये सामील

नवी दिल्ली : कुस्तीपटू विनेश फोगट आणि बजरंग पुनिया यांनी हरियाणा विधानसभा निवडणुकीच्या ३० दिवसांपूर्वी काँग्रेसमध्ये प्रवेश केला असून विनेश जुलाना मतदारसंघातून निवडणूक लढवणार हे निश्चित मानले जात आहे.

बजरंगही निवडणूक लढवणार असल्याची चर्चा आहे. प्रवेशापूर्वी दोघांनी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली आणि त्यानंतर काँग्रेस मुख्यालय गाठले. राज्यात एकाच टप्प्यात ५ ऑक्टोबरला मतदान होणार आहे. ८ ऑक्टोबरला निकाल लागणार आहे. काँग्रेसमध्ये येण्यापूर्वी विनेश आणि बजरंग यांनी रेल्वेची नोकरी सोडली. दोघेही ओएसडी स्पोर्ट्स पदावर होते. वाईट काळात तुमच्यासोबत कोण आहे हे तुम्हाला कळते. विनेश फोगट म्हणाली की, सर्वप्रथम मी देशवासीयांचे आणि माध्यमांचे आभार मानू इच्छितो. मी काँग्रेस पक्षाचा खूप आभारी आहे की वाईट काळात आपल्यासोबत कोण आहे हे कळते.



आंदोलनादरम्यान आम्हाला रस्त्यावर ओढले जात होते, तेव्हा भाजप वगळता देशातील प्रत्येक पक्ष आमच्यासोबत होता. मला अभिमान वाटतो की, मी अशा पक्षात आहे, जो महिलांवरील अन्याय आणि गैरवर्तनाच्या विरोधात उभा आहे. आम्ही जळलेली काडतुसे आहोत, मी राष्ट्रीय खेळलो हे भाजपने दाखवून देण्याचा प्रयत्न केला. लोक म्हणाले की मला ट्रायल न देता ऑलिम्पिकला जायचे आहे, पण मी ट्रायल दिली. मी ज्या गोष्टींचा सामना केला, त्याचा सामना इतर खेळाडूंनी करावा असे मला वाटत नाही. बजरंगवर चार वर्षांची बंदी.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE